अगस्त्य फाऊंडेशन या नामांकित समाजसेवी संस्थेच्या अलिबाग शाखेत Instructor या पदासाठी मुलाखती चालू आहेत.
पात्रता - पदवीधर (BSc/MSc/Bed/Ded/BE)
निवड प्रक्रिया- लेखी परीक्षा व मुलाखत
Contact No.
रोहन म्हात्रे- 7972219362
ईश्वर पाईकराव- 8552877374

# कृषीवल

रायगड, रविवार, दि. १६ जून २०२४

किंमत ४ ₹

**नारळाची वाडी विकणे आहे**
नागाव-अलिबाग, २, ५ एकर नारळाची Fully Developed समुद्रनजीक CRZ च्या बाहेर Clear Title, विहीर, नळ, वीज, खांब, संपूर्ण कायमस्वरुपी कंपाऊंड, सर्व्हे केलेली वाडी विकणे. Direct Party, एजंट सुद्धा चालेल.
संपर्क - 8828363983

## सुरुंग स्फोटाने रोहा हादरला

# एक ठार, एक गंभीर

### बेकायदेशीर स्फोट घडविणाऱ्यावर गुन्हा दाखल

**। रायगड/चणेरा । प्रतिनिधी ।**

शेतामधील पाण्याच्या वाटेत येणारा दगड बाजूला करण्यासाठी सुरूंग लावल्याने सुरूंगाच्या स्फोटात एका दहा वर्षांच्या मुलाचा बळी गेल्याची घटना रोहा तालुक्यातील सारसोली येथे शुक्रवारी (दि. १४) दुपारी दोनच्या सुमारास घडली. या सुरूंगाच्या स्फोटामध्ये अजून एक चिमुकला गंभीर जखमी झाला असून, त्याला जिल्हा सामान्य रुग्णालय अलिबाग येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. विनापरवाना सुरूंग लावणारा शेतकरी दत्ताराम चाळके याच्याविरोधात रोहा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. घटना घडल्यानंतर पोलिसांनी तपास सुरू केला; परंतु दत्ताराम चाळके अद्याप पोलिसांच्या हाती लागलेला नाही.

रोहा तालुक्यातील सारसोली येथील शेतकरी दत्ताराम कृष्णा चाळके यांनी आपल्या शेतात पाणी आणण्यासाठी शेताच्या शेजारी असणाऱ्या ओहळामधून पाणी घेण्याचे ठरवले. त्यानुसार त्यांनी आपल्या अन्य साथीदारांना सोबत घेऊन ओहळातील दगड फोडण्यासाठी सुरूंग लावण्याचे नियोजन केले. त्यासाठी सुरूंग लावण्याचे समान आणून ओहळामध्ये सुरूंग लावला. हे करताना दत्ताराम चाळके यांनी सुरूंग लावण्याची कोणतीही परवानगी घेतली नाही. सुरूंग लावल्यानंतर त्यांनी कोणतीही सुरक्षिततेची काळजी घेतली नव्हती.

दत्ताराम चाळके यांनी शेताशेजारील ओहळामध्ये सुरूंग लावून तो फोडण्याची तयारी केली. त्याचवेळी ओहळाच्या बाजूने सारसोली गावनाजीकच्या खंदार आदिवासी वाडीमधील सुभाष रमेश पवार (वय १०) आणि आर्यन संजय जाधव (वय ८) हे दोघे जात होते. सुरूंग लावल्यानंतर दत्ताराम चाळके आणि त्यांच्या साथीदारांचे याकडे लक्ष राहिले नाही. यामुळे सुभाष आणि आर्यन हे दोघे ओहळाच्या पाण्यातून मनसोक्त हुंदडत आले. परंतु, त्याचवेळी ओहळामध्ये लावलेल्या सुरुंगाचा स्फोट झाला आणि सुभाष आणि आर्यन गंभीर जखमी झाले. यामध्ये सुभाष पवार याचा जागीच मृत्यू झाला, तर आर्यन जाधव गंभीर जखमी झाला. त्याला अधिक उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालय अलिबाग येथे हलविण्यात आले आहे.

•> पान २ वर

## फक्त बाराशे रुपयांसाठी खून

### कळंबोली वसाहतीमधील घटना
### हल्ल्यात एक जण जखमी

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

फक्त बाराशे रुपयांसाठी एका व्यक्तीचा खून झाल्याची घटना कळंबोली पोलीस ठाणे हद्दीत शुक्रवारी (दि. १४) रात्री पावणे बाराच्या सुमारास घडली आहे. घटनेत मध्यस्थी करायला गेलेला एकजण जखमी झाला असून, जखमीवर कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात उपचार सुरु असल्याची माहिती मिळाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, घटनेत मृत्युमुखी पडलेले परवेज अन्सारी आणि आरोपी सद्दामहुसेन अन्सारी हे एकाच ठिकाणी कामाला होते. सुपरवायजर म्हणून काम पाहणाऱ्या परवेज अन्सारी यांच्याकडून सद्दामहुसेन अन्सारी यांना १ हजार २५० रुपये येणे बाकी होते. वारंवार मागणी करुनदेखील पैसे

•> पान २ वर

# विधानसभाही एकत्र लढणार

### महाविकास आघाडीचा निर्धार

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

लोकसभा निवडणुकीतील घवघवीत यशानंतर आता आगामी विधानसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेवून महाविकास आघाडीची शनिवारी दुपारी संयुक्त पत्रकार परिषद झाली. यावेळी आगामी विधानसभा निवडणूकही महाविकास आघाडी एकजुटीने लढणार असा निर्धार करण्यात आला.

देशभक्त आणि लोकशाहीप्रेमी नागरिकांनी महाराष्ट्रात महाविकास आघाडीला आणि

•> पान २ वर



### 'मोदींमुळे महाराष्ट्रात आघाडीला यश'

लोकसभा निवडणुकीत पंतप्रधान मोदींमुळे महाराष्ट्रात महाविकास आघाडीला यश मिळाले, अशी चपकार शरद पवार यांनी यावेळी लगावली. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात इतर पक्षांच्या नेत्यांच्या सभा झाल्या. त्यात पंतप्रधानांच्या १८ सभा झाल्या आणि एक रोड शो झाला. त्यांच्या १८ सभा जिथे झाल्या आणि रोड शो ज्या ठिकाणी झाला, त्या ठिकाणी महाविकास आघाडीच्या उमेदवारांना जनतेने फार मोठ्या प्रमाणात पाठिंबा दिला, असे सांगत शरद पवार यांनी पंतप्रधान मोदींना टोला लगावला. आता विधानसभा निवडणुकीच्या काळात पंतप्रधान जेवढ्या जास्त ठिकाणी भेटीला येतील, तेवढं आम्हाला स्पष्ट बहुमत मिळण्यासाठी अनुकूल वातावरण होईल. त्यामुळे त्यांनाही धन्यवाद देणं हे माझं कर्तव्य समजतो, अशी कोपरखळीही शरद पवार यांनी लगावली.

## भाविकांची बस दरीत कोसळली

### १० ठार, १६ जखमी

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

उत्तराखंडमधील बद्रीनाथ राष्ट्रीय महामार्गावर एक मिनी बस रस्त्यावरुन घसरुन अलकनंदा नदीत जाऊन कोसळली. या दुर्घटनेत आतापर्यंत दहा जणांचा मृत्यू झाला असून, २६ जण जखमी झाले आहेत. दुर्घटनेत जखमी झालेल्या सात जणांना एअरलिफ्ट करुन एम्स ऋषिकेशमध्ये, तर नऊ जणांना रुद्रप्रयाग जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. रद्रप्रयाग जिल्ह्यात रैतोलीजवळ ऋषिकेश-बद्रीनाथ हायवेवर हा अपघात झाला.




## पत्र्यावरून पडून कामगार ठार



**धाटाव :** रोहा तालुक्यातील धाटाव औद्योगिक वसाहतीत खते निर्मिती करणाऱ्या ट्रांसवर्ड फर्टिकेम कारखान्यात उंचावर पत्र्याचे काम सुरू होते. दरम्यान, पत्र्यावरून पडून कामगार जागीच ठार झाल्याची घटना घडली. या घटनेनंतर मयत तरुणाच्या कुटुंबियांना मदत मिळावी म्हणून उपजिल्हा रुग्णालयात असलेला मृतदेह ताब्यात घेण्यास नातेवाईकांनी, ग्रामस्थांनी नकार दिला.

•> पान २ वर

# शाळांमध्ये विद्यार्थ्यांचा किलबिलाट

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

ढोलताशाचा गजर, शिक्षकांनी केलेले औक्षण, गुलाबाच्या फुलांनी झालेले स्वागत, पहिल्याच दिवशी हातात मिळालेली नवी कोरी पुस्तके आणि त्यासोबतच गोड गोड खाऊचे वाटप अशा चैतन्यमयी वातावरणात दोन महिन्यांच्या प्रदीर्घ सुट्टीनंतर रायगड जिल्ह्यातील शाळा शनिवारी (दि. १५) पासून पुन्हा सुरू झाल्या आहेत. पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांच्या




किलबिलाटाने वातावरण भारुन गेले होते. शिक्षकांची शाळेत येणाऱ्या व नव्याने दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांना रमविण्यासाठी सुरू असलेली धावपळ, आईबाबांना सोडवत नसल्याने

•> पान २ वर

### पहिल्या दिवशी गणवेश नाहीच

महिला आर्थिक विकास महामंडळाकडून गणवेश दिले जाणार आहेत. तसेच स्काऊट गाईड्सच्या गणवेशासाठी ११० प्रमाणे शिलाई खर्च दिला जाणार आहे. शाळा व्यवस्थापन समितीच्या माध्यमातून हा खर्च केला जाणार आहे. त्यासाठी शिक्षण विभागाकडून निधी वितरीत केला जाणार असल्याचे जिल्हा परिषद शिक्षण विभागाकडून सांगण्यात आले आहे. पहिल्या दिवशी गणवेश देण्याचे आश्वासन मात्र फोल ठरले.



# पेण भाजपात होणार खांदेपालट

## ■ तालुकाध्यक्ष बदलण्याच्या घडामोडींना वेग

**। पेण । प्रतिनिधी ।**

**नुकत्याच झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीमध्ये महायुतीचे उमेदवार सुनील तटकरे यांना तालुकाध्यक्ष श्रीकांत पाटील यांच्या ओढांगी प्रभागामध्ये फक्त ८ मतांची आघाडी मिळाली, तर वाशी ग्रामपंचायतीमध्ये महायुतीचे उमेदवार सुनील तटकरे यांना १,२३५ तर अनंत गीते यांना १,२९२ मतं मिळाली. एकंदरीत, अध्यक्षांच्या वाशी ग्रामपंचायतीमध्ये ५७ मतांची आघाडी अनंत गीते यांना मिळाल्याने भाजप पक्षश्रेष्ठींकडून नाराजी व्यक्त केली जात आहे.**



या अगोदर ग्रामपंचायतीच्या निवडणुकीमध्येदेखील महाविकास आघाडीचे उमेदवार संदेश ठाकूर हे निवडून आले होते. तेव्हा देखील पक्षश्रेष्ठींनी अध्यक्षांना तंबी दिली होती. मात्र, लोकसभेच्या निवडणुकीमध्ये पुन्हा एकदा अध्यक्षांना आघाडी मिळवण्यात अपयश आल्याने तालुकाध्यक्ष बदलण्याच्या घडामोडींना वेग आला आहे.

पक्षश्रेष्ठींकडून भाजप जिल्हा सरचिटणीस मिलिंद पाटील यांना अध्यक्षपदासाठी विचारणा केली होती. परंतु, त्यांनी नकार दिल्याची चर्चा आहे. त्यामुळे नव्या अध्यक्षाची शोधमोहीम जोरदार सुरू आहे. त्यातच वाशी सरपंच यांचा भाजपमध्ये प्रवेश होत असल्याचे समजते. परंतु, त्यांना तालुकाध्यक्षपदाची अट ठेवल्याने सध्या तरी पक्षप्रवेशाच्या चर्चांना पूर्णविराम दिला आहे. आताच्या घडीला जि.प. सदस्य डी.बी. पाटील अथवा जि.प. सदस्य प्रभाकर म्हात्रे (हरि ओम) यांच्या नावाची चर्चा जोर धरू लागली आहे. एकंदरीत, पेण भाजप तालुकाध्यक्ष बदलण्याच्या घडामोडींचा वेग वाढला असून, विधानसभा निवडणुकीअगोदर तालुकाध्यक्ष बदलला जाणार अशी खात्रीशीर सूत्रांकडून माहिती आहे.

## चिमुकलीवर नराधम पित्याकडून अत्याचार




**। पनवेल । वार्ताहर ।**

आपल्या चार वर्षीय मुलीवर अत्याचार करणाऱ्या पित्याविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. मागील दोन वर्षांपासून या नराधम पित्याने त्याच्या चार वर्षांच्या चिमुरडीवर अत्याचार करण्याचा प्रयत्न केल्याचे पीडितेच्या आईने तक्रारीत म्हटले आहे. सदर आरोपी हा पळस्पे परिसरात राहणारा आहे. त्या दृष्टीने पोलिसांचा तपास सुरू आहे.

## रामा म्हात्रे यांचे निधन

**। पेण । प्रतिनिधी ।**

पेण वढाव येथील पोस्टमन रामा पिठू म्हात्रे यांचे वयाच्या ९७ व्या वर्षी वार्धक्याने निधन झाले. पोस्टमन म्हणजे आनंद व दुःख यांची बातमी पोहोचवणारा पोस्टाचा दूत. आज इंटनेटच्या युगात पोस्टमन हीच प्रजाती नष्ट होत चालली असली तरी, एक काळ असा होता की, पत्र घेऊन येणारा पोस्टमन हा देवदूतापेक्षा कमी नव्हता. रामा पोस्टमन यांनी पेणमधील वाक्रुळ, अलिबागमधील चौल, रेवदंडा येथे व इतर ठिकाणी पोस्टमनचे काम केले. त्यांनी ३८ वर्षे पोस्टाची सेवा केली.



सेवानिवृत्तीनंतर अकादेवीचे ते परमभक्त होते. त्यांनी अकादेवीचे पुजारी म्हणूनदेखील काम पाहिले. त्यांना गावातील देवस्थानाचे प्रखर कथा, किर्तन, प्रवचन भजन तसेच सामाजिक क्षेत्रातील काम याची आवड होती. त्यांची मुले लहान असतानाच त्यांच्या पत्नीला देवाज्ञा झाली. त्यावेळी त्यांनी आपल्या मुलांना आईची माया देऊन त्यांना चांगले संस्कार, चांगले शिक्षण देऊन कामाला लावले. आजही त्यांची तीन मुले पोस्टात काम करतात. त्यांना पाच मुले व दोन मुली, नातवंडे असा त्यांचा मोठा परिवार आहे. त्यांच्यावर वाढव येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी मोठा जनसमुदाय उपस्थित होता.



## साळाव पुलावरून वाहतूक सुरळीत

**रेवदंडा :** साळाव पुलाच्या दुरूस्तीचे काम गेले सहा महिने सुरू होते. सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अखत्यारीत सुरू असलेले साळाव पुलाचे काम नुकतेच आटोक्यात आले असून, पुलावरून वाहतुक सुरळीत सुरू झाली आहे. मुरूड-रोहा-अलिबाग तालुक्यांना जोडणारा व मध्यवर्ती असलेला साळाव-रेवदंडा पुलाचे दुरूस्ती काम गेले दोन वर्षे सुरू आहे. गेल्या नोव्हेंबर महिन्यात पुनश्च सार्वजनिक बांधकाम खात्याने पुलाचे दुरूस्ती काम सुरू केले. यावेळी साळाव पुलावरून अवजड वाहने ने-आण करण्यास बंदी ठेवण्यात आली होती. साळाव पुलाचे काम सुरू असताना पुलावरून एकेरी मार्ग वाहतुकीसाठी खुला होता. मात्र, मुरूड पर्यटन क्षेत्र असल्याने साळाव पुलावरून वाहनांची मोठी रेलचेल सुरू होती. त्यामुळे साळाव पुलावरील एकेरी मार्ग अडथळ्यामुळे नित्याने वाहतूक कोंडी होत होती.

## नेरळमध्ये चोरट्यांचा धुमाकूळ

**। नेरळ । वार्ताहर ।**

नेरळ पोलीस ठाणे हद्दीत चोरट्यांनी पुन्हा एकदा धुमाकूळ घालण्यास सुरुवात केली आहे. चोरट्यांनी दोन घरे तर एका मंदिरामधील देवीची मूर्ती चोरून नेली असून, तीन वेगवेगळ्या ठिकाणी ही चोरी करण्यात आली आहे. शुक्रवारी मध्यरात्री घटना घडली असून, यात सोने, चांदी, रोख रक्कम असा मिळून तब्बल तीन लाखांच्या आसपास चोरट्यांनी ऐवज चोरून नेला आहे. याबाबत अज्ञात चोरट्यांच्या विरोधात नेरळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

कर्जत तालुक्यात पोलिसांनी केलेल्या कारवाईनंतर चोरीचे प्रमाण काही प्रमाणात कमी झाले होते. परंतु, पुन्हा चोरट्यांनी डोके वर काढत पुन्हा एकदा चोरीचा सपाटा लावला आहे. नेरळ पोलीस ठाणे हद्दीत चोरट्यांनी धुमाकूळ घालण्यास सुरुवात केली. दोन घरे, तर एक मंदिर चोरट्यांनी लक्ष्य केले आहे. शुक्रवार १४ जून रोजी पायरमाळ येथील राणे यांचे शंकराच्या मंदिरावर चोरट्याने हात



दोन घरे फोडली, मंदिरातील मूर्तींची चोरी

घातला. मंदिरातील दान पेटी फोडता न आल्याने चोराने येथील पितळेची देवीची मूर्ती चोरून नेली आहे. सोबतच चांदीचे नाग, तर पितळेच्या समया चोराने लंपास केल्या आहेत. दरम्यान, हा सर्व प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला असून, याबाबत नेरळ पोलीस ठाण्यात माहिती देण्यात आली.

याही अगोदर नेरळ पोलीस ठाणे हद्दीत १२ जून रोजी शेलू परिसरातील एन.डी. स्कूलजवळ स्वामी आश्रय या इमारतीमधील ए विंगच्या दुसऱ्या मजल्यावरील रूम नं २०२ मध्ये फिर्यादी झोपले असताना चोरट्यांनी खिडकीमधून घरात प्रवेश केला. दरम्यान, बेडरूममधील लाकडी कपाटातून एकूण १,५६,०००/- रुपये व सोन्याचे दागिने व रोख रक्कम आणि महत्त्वाची कागदपत्रे हे अज्ञात चोरट्यांनी पळवून नेली आहेत. तिसऱ्या घटनेत नेरळ पोलीस ठाण्याच्या हाकेच्या अंतरावर असणारे खांडा परिसरातील सेवालाल सोसायटीतील रूम नंबर. ०३ दुसरा मजल्यावर चोरी झाली आहे. घरमालक घरात नसल्याचा फायदा घेत चोरट्याने बंद घराच्या दाराचा कडी कोयंडा तोडून घरातील किचन रुममध्ये असलेले कपाटाचे कुलूप फोडले आहे. कपाटाच्या आतील लॉकरमधील १,१३,०००/- रुपये किमतीचे दागिने व रोख रक्कम असा ऐवज चोराने लुटला. दरम्यान, तीन वेगवेगळ्या घटनेबाबत नेरळ पोलीस ठाण्यात अज्ञातांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

## पेणमध्ये आठ मतदान केंद्र

**पेण :** २६ जून रोजी होऊ घातलेल्या कोकण पदवीधर मतदारसंघाचे मतदान होत असून, पेण तालुक्यात एकूण आठ मतदान केंद्रांवर मतदान होणार आहे. यामध्ये तीन मतदान केंद्र हे सार्वजनिक विद्या मंदिर पेण येथे असून, ५६ नंबरचे मतदान केंद्र हे खोली नं. ९ मध्ये, ५७ नंबरचे मतदान केंद्र हे खोली नं. १६ मध्ये, तर ५८ नंबरचे मतदान केंद्र हे खोली नं. १७ मध्ये असणार आहे. तर, श्रीमती सुमतीबाई वि.देव प्राथमिक विद्या मंदिर येथे ५६अ तळमजला खोली नं. ११२, ५७अ तळमजला खोली नं. ११३, ५७ब तळमजला खोली नं. ११७, ५८अ तळमजला खोली नं. १०३, ५८ब तळमजला खोली नं.११६ अशी एकूण आठ मतदान केंद्रे आहेत. बुधवार, दि. २६ जून रोजी सकाळी ७ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत मतदान होणार आहे.

## कृषीवलच्या दणक्यानंतर आरोग्य विभागाला जाग

### ■ जिते गावाला जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांची भेट



**। खरोशी । वार्ताहर ।**

पेण तालुक्यातील जिते आणि रावे या दोन गावांमध्ये डेंग्यूची साथ पसरल्यामुळे बारा रुग्ण पॉझिटिव्ह सापडले आहेत. याबाबत कृषीवलने आवाज उठवल्यानंतर आरोग्य तंत्रणा खडबडून जागी झाली असून, आरोग्य अधिकाऱ्यांनी जिते गावाला भेट देऊन उपाययोजनांबाबत सूचना दिल्या.

दरम्यान, डेंग्यूची लागण मोठ्या प्रमाणात होऊ नये व योग्य वेळी त्यांच्यावर उपचार व्हावेत याकरिता शनिवारी (दि. १५) रायगड जिल्हा परिषद अलिबाग येथील डीएचओ डॉ. मनीषा विखे, एडीएचएस मलेरिया डॉ. सोनवणे, डीएमओ डॉ. भोसले, तालुका आरोग्य अधिकारी अपर्णा खेडेकर यांच्या पथकाने ग्रामपंचायत कार्यालय आणि जिथे प्राथमिक आरोग्य केंद्र यांना भेट देऊन डेंग्यूची साथ नियंत्रण आणण्याबाबत सक्त ताकीद देऊन योग्य त्या सूचना दिल्या आहेत.

दरम्यान, ग्रामपंचायत आणि पेण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांच्यामार्फत जनजागृती करणे, गावात स्वच्छता ठेवणे, रुग्ण आहेत तोपर्यंत गावात सर्वे चालू ठेवणे, सीएचओमार्फत तपासणी करणे, बुधवार हा दिवस कोरडा पाळणे, औषधसाठा भरपूर ठेवणे, प्राथमिक उपचार जिते प्राथमिक आरोग्य केंद्रातच देणे, अशा विविध सूचना देण्यात आल्या आहेत. दरम्यानच्या काळात गावातील सर्व रुग्णांवर योग्य उपचार चालू असून, ते लवकरात लवकर बरे होतील, असेही सांगितले.

## रस्त्यालगतचे सरकारी पाईप चोरणारा गजाआड

**। पनवेल । वार्ताहर ।**

नवीमुंबईपोलीसआयुक्तालयाच्या हद्दीतील रस्त्यालगत जलवाहिन्या व इतर कामासाठी टाकलेले सरकारी लोखंडी पाईप चोरणारा सराईत गुन्हेगार नवी मुंबई पोलीस गुन्हे शाखा युनिट तीनने शिताफीने पकडला असून, त्याची रवानगी तळोजा कारागृहात करण्यात आली आहे.

दरम्यान, नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतील वाशी, उरण, खारघर, उल्हासनगर व मुंबई येथील रस्त्यालगत जलवाहिन्या व इतर कामासाठी ठेवलेले पाईप व केबल चोरीच्या घटना गेल्या अनेक वर्षांपासून मोठ्या प्रमाणात होत होत्या; परंतु या चोऱ्या करणारा सराईत गुन्हेगार पोलिसांच्या हातावर तुरी देत होता. चोरी करण्याची ठिकाणे बदलून हा सराईत गुन्हेगार चोरी करत असे. एहसनुल्लाह मोहम्मद नाईम शेख ऊर्फ सानू, रा. साकीनाका व त्याचा साथीदार राजपथ रमामिलान गौड यास युनिट तीनच्या पथकाने अटक केली आहे. सदर सराईत हा महामार्ग व नवीन विकसित होत असलेली ठिकाणे हेरून त्या रस्त्यालगत असलेल्या जलवाहिनीसाठी व इतर कामासाठी टाकलेले पाईप सदर ठिकाणची रेकी करून सुट्टीच्या दिवशी चोरी करत असे. या कामासाठी तो नवी मुंबईमधील रस्त्याने जात असलेले हायड्राक्रेन व ट्रेलरचा उपयोग करत असे. सदर चोर हा मोबाईलवरून हायड्राक्रेन व वाहनतळावरील ट्रेलरवरून ट्रेलर मालकाचा नंबर मिळवून त्यांना फोन करून ट्रेलर व हायड्राक्रेनचा समन्वय घडवून शिताफीने पाईप गाडीवर लोड करून भंगारवाल्यांना हे पाईप विकत असे. हायड्राक्रेन व वाहतूकदारांना



नियमित भाड्यापेक्षा थोडे जास्त व रोख स्वरूपात भाडे देत असल्याने व सुट्टीच्या दिवशी व्यवसाय मिळत असल्याने सदर व्यावसायिक हे कुठलीही शहनिशा न करता सदर सराईताला आपली वाहने देत असत.

## बुरखाधारी महिलांनी सराफाला लुटले

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल शहरातील जोशी आळी येथील कांचन ज्वेलर्स या सराफाच्या दुकानात दोन बुरखाधारी महिलांनी गिऱ्हाईक म्हणून प्रवेश करून एक लाख रुपये किमतीचा सोन्याचा हार चोरुन नेल्याची घटना घडली आहे. यासंदर्भात पन्नालाल बाफना यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिली असून, या तक्रारीच्या आधारे परिसरातील सीसीटीव्ही फुटेजद्वारे या बुरखाधारी महिलांचा पनवेल शहर पोलीस शोध घेत आहेत.

## महामार्गावर टेम्पोला अपघात

**। कोलाड । वार्ताहर ।**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग ६६ वरील महाडकडून मुंबईकडे जाणाऱ्या गाडी क्र. एम.एच.०६ बी.डी. ३१३२ हा टेम्पो धरणाची वाडी येथील रस्त्याच्या साईडला पलटी झाल्याने हा अपघात झाला असून, सुदैवाने वाहनचालक बालंबाल बचावला आहे.

महामार्ग चौपदरीकरणाचे काम गेली १६ वर्षांपासून सुरु असून, या महामार्गाच्या साईडपट्ट्यांचे काम एवढे निकृष्ठ दर्जाचे आहे, हे या अपघातावरून दिसून येते. कारण, महाडकडून मुंबई जाणारा टेम्पो धरणाची वाडी येथील वळणावर

सुदैवाने वाहनचालक बालंबाल बचावला



आला असता टेम्पोची चाके मातीत रुतून तो पटली झाला. सुदैवाने वाहनचालक बचावला आहे.

पान १ वरून

## एक ठार, एक गंभीर

याबाबतची फिर्याद मंगेश पवार यांनी रोहा पोलीस ठाण्यात केली आहे. या फिर्यादीनुसार पोलिसांनी दत्ताराम चाळके यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. या गुन्ह्याचा तपास रोहा पोलीस निरीक्षक देवीदास मुपडे यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय वायंगणकर करीत आहेत.

## फक्त बाराशे रुपयांसाठी खून

मिळत नसल्याने सद्दामहुसेन याने शुक्रवारी परवेज अन्सारी याचे घर गाठून पैसे देण्याची मागणी केली. मात्र, परवेज याने पैसे देण्यात असमर्थता दाखवल्याने सद्दामहुसेन आणि त्याच्यासोबत आलेल्या दोघांनी परवेज यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली. परवेज यांना मारहाण होत असल्याचे लक्षात आल्यावर मारहाण थांबवण्यासाठी गेलेल्या त्यांच्या नातेवाईकांवरदेखील सद्दाम आणि त्याच्या सहकाऱ्यांनी आपल्याकडील चाकूने हल्ला केला. हल्ल्यानंतर जखमी झालेल्या परवेज आणि त्याच्या नातेवाईकाला कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात दाखल केले असता परवेज यांना डॉक्टरांनी मृत घोषित केले. या घटनेचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.

## शाळांमध्ये विद्यार्थ्यांचा किलबिलाट

विद्यार्थ्यांची होणारी घालमेल अशा वातावरणात आज शाळेची पहिली घंटा वाजली. प्रवेशोत्सवामध्ये विद्यार्थी, पालक, शिक्षक, शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, सभासद मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

आजपासून २०२४-२५ या शैक्षणिक वर्षास प्रारंभ झाला. शाळेचा पहिलाच दिवस असल्याने सकाळपासून शाळांमध्ये विद्यार्थ्यांसह पालकांची प्रचंड गर्दी होती. विद्यार्थ्यांना शाळेची ओढ निर्माण व्हावी यासाठी त्यांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत केले. मुलांना खाऊ देण्याबरोबरच मोफत पाठ्यपुस्तके वितरीत करण्यात आली. त्यामुळे एक वेगळा उत्साह विद्यार्थ्यांमध्ये दिसून आला. जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागातील काही अधिकाऱ्यांनी शाळांना भेटी दिल्या. विद्यार्थ्यांसह शिक्षक, शाळा व्यवस्थापन समितीच्या पदाधिकारी सदस्यांचे प्रबोधन करीत जिल्हा परिषद शाळेचे महत्त्व पटवून दिले. जिल्ह्यातील काही शाळांमार्फत गावांमध्ये प्रभात फेरी काढण्यात आली. जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांना पाठविण्याचे आवाहन या फेरीच्या मार्फत करण्यात आले. अनेक शाळांमध्ये माजी शिक्षक, माजी विद्यार्थ्यांनी भेट देऊन विद्यार्थ्यांशी गप्पा मारल्या. शाळेचा पहिला दिवस चैतमन्य व उत्साहवर्धक वातावरणात पार पडला.

**सीईओंनी साधला विद्यार्थ्यांशी संवाद**

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी अलिबाग तालुक्यातील पोयनाड येथील जिल्हा परिषद शाळेला भेट दिली. यावेळी नव्याने दाखल होणाऱ्या शाळेतील विद्यार्थ्यांचे त्यांच्या हस्ते गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांनी संवाद साधला, त्यांच्याशी गप्पागोष्टी करून मार्गदर्शन केले. दरम्यान, शाळेत विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकेदेखील वाटप करण्यात आली. यावेळी उपशिक्षणाधिकारी संतोष शेडगे, गटशिक्षणाधिकारी कृष्णा पिंगळा, माजी सरपंच भूषण चवरकर, शाळेचे मुख्याध्यापक विनायक पाटील, सेवानिवृत्त शिक्षक जनार्दन पाटील, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

**विद्यार्थ्यांना मिळणार नवे शूज**

रायगड जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांची पटसंख्या वाढावी, विद्यार्थ्यांना जिल्हा परिषद शाळेबाबत आकर्षण निर्माण व्हावे यासाठी प्राथमिक शिक्षण विभागामार्फत जिल्ह्यातील दोन हजार ६४३ शाळेतील एक लाख ३८९ विद्यार्थ्यांना मोफत शूज दिले जाणार आहेत. पहिली ते आठवीच्या प्रत्येक विद्यार्थ्यामागे शूज आणि सॉक्ससाठी १७० प्रमाणे एक कोटी ७० लाख ६६ हजार रुपयांचा खर्च केला जाणार असून, दोन दिवसात ते देण्यात येणार असल्याची माहिती शिक्षण विभागाने दिली.

**एसटीअभावी शाळेला दांडी**

सकाळी शाळेत जाण्यासाठी विद्यार्थ्यांनी तयारी केली. मात्र, एसटी बस न आल्याने विद्यार्थ्यांना पहिल्याच दिवशी शाळेला दांडी मारावी लागली. उन्हाळी सुट्टीत शाळेच्या फेऱ्या बंद करण्यात आल्या होत्या. मात्र, शाळा सुरु झाल्याची माहिती असतानादेखील एसटी महामंडळ रायगड विभागाकडून पहिल्या दिवशी शाळेच्या फेऱ्या सोडल्या नाही. त्यामुळे काही विद्यार्थ्यांना शाळेत वेळेवर पोहोचता आले नाही, तर काही विद्यार्थ्यांनी शाळेत जाता आले नाही. एसटी महामंडळाच्या या भोंगळ कारभाराचा फटका विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर पहिल्याच दिवशी बसला.

**साडेसतरा हजार नवे विद्यार्थी**

रायगड जिल्ह्यात शाळा सुरू झाल्या आहेत. शाळा पूर्वतयारीचे नियोजन जिल्ह्यातील अनेक शाळांमध्ये करण्यात आले. सर्वेक्षणानुसार जिल्ह्यात नव्याने दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या १७ हजार ५२९ इतकी आहे.

## विधानसभाही एकत्र लढणार

देशात इंडिया आघाडीला कौल दिला. पण हा विजय अंतिम नाही, लढाई आता सुरू झाली आहे, असे म्हणत शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी विधानसभा निवडणुकीचे रणशिंग फुंकले.

मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटरमध्ये झालेल्या या पत्रकार परिषदेमध्ये शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तरे दिली. यावेळी महाविकास आघाडीच्या बाजूने कौल देणाऱ्या महाराष्ट्रातील जनतेचे उद्धव ठाकरे यांनी आभार मानले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, आमदार जितेंद्र आव्हाड, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण, माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात, शिवसेना नेते खासदार संजय राऊत, खासदार अरविंद सावंत, खासदार अनिल देसाई यांच्यासह आघाडीतील नेते उपस्थित होते.

## पत्र्यावरून पडून कामगार ठार

कंपनी व्यवस्थापन आणि ग्रामस्थ यांच्यात सदर घटनेबाबत दुसऱ्या दिवशीही कुठलाही तोडगा न निघाल्याने वातावरण तंग होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊन नये तसेच शांततेचा भंग होऊ नये म्हणून उपजिल्हा रुग्णालयात चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला. जवळपास ५० पोलीस कर्मचारी, अधिकारी व जवान या ठिकाणी हजर असल्यामुळे परिसराला पोलीस छावणीचे स्वरूप आल्याचे पहावयास मिळाले. दरम्यान, घडलेल्या दुर्घटनेमुळे कामगार वर्गात एकच खळबळ उडाली असून, येथील वातावरण मात्र भयभीत झाल्याचे पहावयास मिळाले.

मिळालेल्या माहितीनुसार, संकेत पाटील (२६, रा. आंबेघर-नागोठणे) असे मयत तरुणाचे नाव असून, मयत तरुण संकेत पाटील, रवी रघुनाथ वाघमारे (२४, रा. धामनसई, ता. रोहा ) व अन्य दोन असे एकूण ४ कामगार शुक्रवारी (१४ ) रोजी दुपारी ४ च्या सुमारास धाटाव औद्योगिक वसाहतीतील ट्रान्सवर्ल्ड फर्टीकेम प्रा.लिमिटेड या कंपनीतील गेटसमोर असलेल्या हॉलवरील तुटलेले पत्रे दुरुस्तीचे काम करीत होते. उंच ठिकाणी काम करीत असल्यामुळे सेफ्टीबेल्ट लावून पत्रे दुरुस्त करीत असताना सेफ्टीबेल्ट ज्या रस्सीला बांधला होता, ती रस्सी मध्येच तुटल्याने कामगार संकेत पाटील हा सेफ्टी बेल्टसहित खाली सिमेंट कॉंक्रिटवर पडून त्याच्या डोक्याला, हाताला, पायांना कंबरेला गंभीर दुखापत झाल्याने त्याला तातडीने रोहा उपज्लिहा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासल्यानंतर त्याला मयत घोषित केले.

कंपनीत घडलेल्या अपघातात गावातील तरुणाचा मृत्यू झाल्याची माहिती समजताच मयताच्या नातेवाइकांसह आंबेघर ग्रामस्थांनी रोहा उपजिल्हा रुग्णालयात धाव घेउन कंपनी व्यवस्थापनकडून मदतीची अपेक्षा व्यक्त केली होती. नातेवाईक, ग्रामस्थांसह कामगार वर्ग मोठ्या संख्येने जमा झाल्याने या ठिकाणी जमलेल्या जमावानंतर पोलीस कर्मचाऱ्यांची जादा कुमक बोलविण्यात आली होती. तर शनिवारी दुपारपर्यंत शासकीय रुग्णालयाला पोलीस छावणीचे स्वरूप आल्याचेही पहावयास मिळाले. याविषयी कामगार रवी वाघमारे याच्या फिर्यादीनुसार आकस्मिक मृत्यू झाल्याचा गुन्हा रोहा पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे.

अखेर दुपार नंतर याबाबत योग्य तो तोडगा निघाल्यानंतर नातेवाईक आणि ग्रामस्थानी मृतदेह ताब्यात घेतला. सध्या परिस्थिती शांत असल्याची माहिती रोहा पोलिसांनी दिली. दरम्यान, या घटनेचा तपास रोहा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक देविदास मुपडे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

## सागरी सुरक्षा रक्षक, ग्रामरक्षक दलाची बैठक



**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल तालुक्यातील केळवणे गावातील सागरी सुरक्षा रक्षक, ग्रामरक्षक दल यांची बैठक वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक जगदीश शेलकर यांनी पोलीस ठाणे येथे आयोजित केली होती. या बैठकीत उपस्थित सभासदांना खाडी किनारपट्टी, परिसरातील हालचालींवर लक्ष ठेवणे बाबत महत्त्वाच्या सूचना देऊन संशयित, अवैध हालचाली निदर्शनास आल्यास तात्काळ कोस्टल हेल्पलाईन १०९३ या क्रमांकावर संपर्क करण्यास सांगितले. याबाबत पोलीस ठाण्यास कळविण्याच्या सूचना दिल्या. तसेच त्यांच्या अडीअडचणींचे निरसन केले. यावेळी गोपनिय विभागाचे अधिकारी कुंवर व पंकज शिंदे यांनीसुद्धा आवश्यक ते मार्गदर्शन केले.

## ..अन् पनवेलकरांनी निःश्वास सोडला

### ■ पोलिसांचे हल्लेखोरांचा बनाव असणारे मॉक ड्रिल

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल शहरातील टपाल नाका येथील बेथ एन प्रार्थनालयामध्ये काही अज्ञात इसम शस्त्र घेऊन हल्ला करण्याच्या उद्देशाने आतमध्ये घुसल्याची माहिती शनिवारी (दि. १५) सकाळी पनवेल शहर पोलिसांना मिळताच क्युआरटी पथकाने सदर ठिकाणी जाऊन अत्यंत शिताफीने एका इसमास ठार मारले, तर त्याच्या सहकाऱ्यास जिवंत पकडून ताब्यात घेतले आहे. या घटनेनंतर पनवेलकरांनी सुटकेचा निःश्वास सोडला असला तरी सदर घटना ही पोलिसांचेच मॉक ड्रिल असल्याचे निष्पन्न झाले.



शहरातील बेथ एन प्रार्थनालय हे अत्यंत महत्त्वाचे ठिकाण असून, या ठिकाणी मॉक ड्रिल करण्याच्या उद्देशाने विशेष ऑपरेशन क्युआरटीच्या माध्यातून राबविण्यात आले. या ऑपरेशनदरम्यान पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वपोनि नितीन ठाकरे, वाहतूक शाखेचे वपोनि संजय पाटील, पोलीस निरीक्षक भगत यांच्यासह पनवेल महानगरपालिकेचे अग्नीशमन दल, रुग्णवाहिका इतर अत्यावश्यक सेवा, ७ पोलीस अधिकारी व ५७ कर्मचारी यात सहभागी झाले होते. या ऑपरेशनदरम्यान सदर ठिकाणी घुसलेल्या दोन शस्त्रधारी इसमांपैकी एकाला ठार मारण्यात आले, तर एकास जिवंत पकडण्यात आले. त्याची बीडीडीएस पथकाकडून कसून तपासणी करण्यात आली व त्याच्याकडील शस्त्र व दारुगोळा ताब्यात घेण्यात आला. आतमध्ये कोणालाही जखमा झाल्या नाहीत, अशी माहिती पोलीस अधिकाऱ्यांकडून देण्यात आली.

# जिल्ह्यातील शाळांमध्ये गुंजला घंटानाद

१५ जून म्हटले की विद्यार्थ्यांना उत्सुकता असते ती शाळेच्या पहिल्या दिवसाची. उन्हाळी सुट्टी संपल्यावर आणि वरूणराजाचे आगमन होताच शनिवारपासून पुन्हा एकदा जिल्ह्यातील शाळांमध्ये घंटानाद गुंजला आहे. यामुळे महिना दोन महिन्यांच्या विश्रांतीनंतर शाळेत जात असल्याने विद्यार्थ्यांमध्ये उत्साह आणि वेगळाच आनंद पहायाला मिळाला. यावेळी शिक्षक वर्गाकडून वेगवेगळ्या पद्धतीने मुलांचे स्वागत करताना दिसून आले. शाळेच्या पहिल्या दिवशी मुलांना शाळेत सोडण्यासाठी पालकवर्ग देखील मोठ्या हौसेने हजर झाल्याचे पहायला मिळाले. तसेच, शालेय परिसरात विद्यार्थ्यांचा किलबिलाटही पहायला मिळाला.



● गोंधळपाडा येथील रायगड जिल्हा परिषद शाळेत शाळेच्या मुख्याध्यापिका व सहशिक्षक यांनी आरती ओवाळून आणि गुलाब पुष्प देऊन स्वागत केले. शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आल्याने विद्यार्थ्यांचे चेहरे फुलले होते.
(छायाचित्र- समीर मालोदे)



● बेलोशी शाळेत चालत जाताना विद्यार्थी







● चला आम्ही शाळेत निघालो, तुम्ही पण या शिका आणि मोठे व्हा! पनवेल महानगरपालिका विद्यालयात शाळेच्या पहिल्या दिवशी समाज सेविका सावित्री बाई फुले यांच्या प्रतिमेची वाजत गाजत दिंडी काढण्यात आली होती. यावेळी नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत गुलाब पुष्प तसेच चॉकलेट देत औक्षण करत शिक्षणधिकारी यांच्या हस्ते नवीन पुस्तके देऊन करण्यात आले. यामध्ये शिक्षणाधिकारी, शिक्षक वर्ग, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## ज्ञानमंदिरात निघालो आम्ही



**। धाटाव । वार्ताहर ।**

शनिवारी (दि.१५) धाटावच्या केंद्रीय शाळेत सकाळच्या शाळेला सुरुवात झाली. दोन महिन्यांच्या विश्रांतीनंतर यावेळी शाळेत जात असल्याने विद्यार्थ्यांमध्ये वेगळाच उत्साह आणि आनंद पहायला मिळाला. शिक्षक वर्गाकडून वेगवेगळ्या पद्धतीने मुलांचे स्वागत करताना दिसून आले. शाळेच्या पहिल्या दिवशी मुलांना शाळेत सोडण्यासाठी पालकवर्ग देखील मोठ्या हौसेने हजर झाल्याचे पहायला मिळाले.

शाळेमधील नवीन विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प, चॉकलेट, खाऊ वाटप करण्यात आले. तर, विद्यार्थ्यांचे औक्षण करून फुलांची उधळण करण्यात आली. शाळेचा हा पहिला दिवस उत्साहात साजरा झाला असून विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पहायला मिळाले. शाळेबाहेर रांगोळ्या काढण्यात आल्या असून सूचना फलक व फळे सजविण्यात आले होते. विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यासाठी प्रवेशद्वाराभोवती शिक्षकवर्ग, कर्मचारी स्वत: उभे राहिले होते. यावेळी मुख्याध्यापक सुनील पारठे, गायकर, मानसी थळे, निकिता धुपकर, प्रणाली जंगम, मोहिनी पाटील, अशोक भोकटे यांसह कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

## रातवड विद्यालयात नवागतांचे स्वागत

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव तालुक्यातील माध्यमिक विद्यामंदिर रातवड विद्यालयात शनिवारी (दि.१५) शैक्षणिक वर्षे २०२४-२५ मधील शालेय प्रथम दिनाचे औचित्य साधून नवागतांचे स्वागत व मोफत पाठ्यपुस्तक वितरण करण्यात आले. तसेच, शाळेच्या प्रथम दिनाचे औचित्य साधून नवागत विद्यार्थ्यांचे औक्षण करुन मान्यवरांच्या हस्ते गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी सरपंच वैशाली जाधव, सतीश पवार, भालचंद्र खाडे, गजानन पाटील, पालक वृंद व मान्यवर उपस्थित होते.






● शाळेतील आजचा पहिला दिवस अन् आपल्या जुन्या मित्रांसोबत मजा मस्ती करत विद्यार्थ्यांची पावले शाळेकडे फिरकायला लागली. (छाया: सुधीर नाझरे)

## पूर्व तयारी मेळावा उत्साहात

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव तालुक्यातील देगाव रा.जि.प. शाळेत शनिवारी (दि.१५) शाळा पुर्व तयारी मेळावा उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी नवागतांचे स्वागत, मोफत पुस्तके वाटप, शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रम संपन्न झाले.

'प्रथम शाळा पूर्व तयारी' अभियान अंतर्गत प्रभात फेरी काढण्यात आली. त्यानंतर इयत्ता पहिलीत दाखल होणाऱ्या मुलांचे औक्षण करून स्वागत करण्यात आले. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणाऱ्या आविष्कार फाउंडेशन इंडीया मार्फत ॲड. पुंडलिक मालोरे, धोंडीराम सूर्यवंशी, खाडे, सचिन मोरे व उपस्थित इतर पालक वर्गाचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.



यावेळी मुख्याध्यापिका ऊर्मिला मोरे, शंकर शिंदे, प्रतिक्षा आंबुर्ले, समिक्षा दिवेकर, शेजल कदम, रोहिणी गायकवाड, ललिता पवार, बेबी पवार, रुपाली पवार, सखाराम मर्चंडे, प्रविणा शेलार आदिंसह पालकवर्ग व देगाव ग्रामस्थ उपस्थित होते.




● महाजने येथील दिवीवाडी शाळेत पाठ्यपुस्तक देण्यात आले.

## विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**। सोगाव । वार्ताहर ।**

अलिबाग तालुक्यातील मूनवली येथील सामाजिक कार्यकर्ते सचिन घाडी यांनी शनिवारी (दि.१५) शाळा सुरू होण्याच्या पहिल्याच दिवशी सोगाव येथील रायगड जिल्हा परिषदेच्या उर्दू व मराठी शाळेत गरीब गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप केले.

या कार्यक्रमाला उपस्थित सर्व मान्यवरांचे दोन्ही शाळेच्या शिक्षक वर्गांनी गुलाबपुष्प देऊन स्वागत केले. या कार्यक्रमाला सुनिल थळे, चांदोरकर, समद कुर, अनिल जाधव, चंद्रकांत खोत, सानिका घाडी, लाईक कप्तान, किशोर सातमकर, नितीन अधिकारी,



स्मिता राऊत, सुरेश राऊत, राजू पडते, सतिश घाडी, सचिन घाडी, सूचित थळे, शैलेश तिर्लोटकर, मुनावर कुर, तसेच ग्रामस्थ, शिक्षक वर्ग, अंगणवाडी सेविका व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




● महाजने शाळेत नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत व विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तक वाटप करण्यात आले.



## शाळेचा पाहिला दिवस उत्साहाचा

**। म्हसळा । वार्ताहर ।**

दीड महिन्यापेक्षा जास्त दीर्घाकाळाच्या प्रतीक्षेनंतर शनिवारी (दि.१५) ज्ञानमंदिरे उघडली. यावेळी मराठी प्राथमिक शाळा म्हसळा येथे येणाऱ्या विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. त्यामुळे दीर्घ काळानंतर विद्यार्थ्यांचा किलबिलाट, आनंद आणि उत्साह दिसून आला. शाळेत प्रवेश होतेवेळी विद्यार्थ्यांना खाऊंचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांचे स्वागत करून सर्व विद्यार्थ्यांना सन्मानाने पुस्तकांचे वाटप करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापिका सुमित्रा खेडेकर, इंदिरा चौधरी, तिलोत्तमा गायकवाड, जयश्री गायकवाड, श्रीधर उमदी, शशिकांत शिर्के, समिधा वेदक, वैशाली करडे, विनोद ओसवाल, सुशिल यादव, सोनाली लहारे, मनस्वी जाधव, मयूर बनकर, अजय करंबे, स्नेहल निजामपूरकर आदि उपस्थित होते.



● पोयनाड येथील शाळेत मुख्य कार्यकारी अधिकारी बास्टेवाड यांची हजेरी

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

१६ जून

१) श्री.हरिश्चंद्र श्रीपत पिळकर, अलिबाग, १६-६-१९५३

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-**
८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**देविका मुकेश जैन, वाढदिवस, अलिबाग**

# मैदानात आणखी एक व्यासपीठ

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

**नेरळ ग्रामपंचायतच्या मालकीच्या छत्रपती शिवाजी महाराज मैदानात एक व्यासपीठ असून त्या व्यासपीठाच्या मागे दोन खोल्या देखील आहेत. मात्र तरी देखील राज्यसरकारच्या प्रादेशिक पर्यटन विकास कार्यक्रमामधून नवीन व्यासपीठ बांधले जात आहे. दरम्यान, निधीचा अपव्यह करण्यासाठी नवी व्यासपीठ बनविले जात असल्याचे आरोप नेरळ मधील ग्रामस्थ करीत आहेत.**



नेरळ येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदान गावाच्या मध्यभागी असल्याने गावातील मुलांसाठी खेळण्याचे मैदान म्हणून प्राधान्याने वापरले जाते. या मैदानाला चोहोबाजूंनी भिंती आणि लोखंडी गेट देखील आहे. शासनाच्या निधीमधून ती कामे झाली असून आता पुन्हा शासनाच्या प्रादेशिक पर्यटन विकास कार्यक्रमामधून शिवाजी महाराज मैदानाचे सुशोभीकरणाचे काम सुरु आहे. जुने व्यासपीठ असताना नव्याने व्यासपीठ बनविण्याची गरज काय? असा प्रश्न आता नव्याने उपस्थित होत आहे. त्यात मैदानावर भिंती असताना त्यावर एक फूट बांधकाम करून नव्याने संरक्षण भिंती दाखवण्याचे काम मैदानात सुरु आहे. आता त्यात नव्याने व्यासपीठ बांधले जात असल्याने जुन्या व्यासपीठाचे करायचे काय? खेळासाठी जागा कमी होत असल्याने लहान मुले देखील नाराज आहेत. निधी कुठेतरी खर्च व्हावा म्हणून नेरळ गावात छत्रपती शिवाजी महाराज मैदानात व्यासपीठ बांधण्यात येत आहे काय? असा सवाल देखील स्थानिक विचारीत आहेत.

# अंकुश माने यांचा दौरा

**। रसायनी । वार्ताहर ।**

खालापूर तालुक्याला कृषी क्षेत्रात प्राधान्य मिळत असुन कृषी संचालक अंकुश माने यांनी खालापूर तालुक्याचा दौरा करुन कृषी पुरक सर्व व्यवस्थेची पाहणी करून समाधान व्यक्त केले.

खालापूर तालुका हा रायगड जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रात व्यवसाय करणारा अग्रेसर तालुका असला तरी येथील अनेक शेतकरी आजही शेती करण्यावर भर देत आहेत. आता पावसाळा सुरू झाला असून तालुक्यातील शेतकरी, लाभार्थी, शेती सेवा केंद्र, आधुनिक शेती, मॅट शेती, नर्सरी यांची संयुक्त पाहाणी करुन समाधान व्यक्त केले. गोरठण येथील ज.गो. हाडप यांच्या कृषी सेवा केंद्राला भेट देऊन तेथील सर्व व्यवस्थेची पाहणी करून बियाणे, खत यांच्या उपलब्धते बाबत माहिती घेतली. अष्टविनायक क्षेत्रातील महड येथे मोरेश्वर वामन कोषे यांच्या मॅट भात नर्सरीची पाहाणी केली, त्यांना व त्या परिसरातील शेतकरी यांना मार्गदर्शन केले. राज्य कृषी यांत्रिकीकरण अंतर्गत सौ. लिला मोरेश्वर कोशे यांना देण्यात आलेल्या आधुनिक ट्रॅक्टर ची पाहाणी केली. यावेळी त्यांनी प्रात्यक्षिक करून घेतले व मार्गदर्शक सूचना केल्या.



## रिलायन्य स्कूलच्या विद्यार्थ्यांचे यश

**। रसायनी । वार्ताहर ।**



इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी द्वारा जॉइंट एंट्रन्स एक्झामिनेशन ही पात्रता परीक्षा घेण्यात आली होती. या परिक्षेत लोधिवली येथील रिलायन्स फाऊंडेशन स्कूल इयत्ता दहावी आणि बारावी बोर्डामध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करून अलौकिक यश संपादन केले आहे. हमुसिनी यल्लामर्थी हिने ७३.९२ गुणतालिकेवर, क्षितीज परांजपे याने ७८.३७ गुणतालिकेवर, विजित देवगडे याने २१.२७ या गुणतालिकेवर आपले स्थान मिळविले आहे. विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या घवघवीत यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक धिरेंद्र हरबोला, शालेय व्यवस्थापन कमिटी, सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि पालकांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# भर पावसात रस्त्याचे डांबरीकरण

**। नेरळ । प्रतिनिधी ।**



१५ मे नंतर कोणत्याही रस्त्यावर डांबरीकरण करण्यात येऊ नये असे नियम असताना देखील कोल्हारे ग्रामपंचायत मधील बोपेले आगरी समाज हॉल परिसरातील रस्त्यावर डांबरीकरण करण्यात आले. डांबरीकरण सुरू असताना पाऊस पडल्यामुळे या ठिकाणी करण्यात आलेले डांबरीकरण कितपत टिकाव धरू शकते, हा मोठा संशोधनाचा विषय आहे.

माथेरान - नेरळ कळंब राज्यमार्ग रस्त्यावर कोल्हारे ग्रामपंचायतमध्ये बोपेले येथील भागात आगरी समाज हॉलच्या समोरील आसरा अनाथाश्रमाकडे जाणारा रस्ता डांबरीकरण करण्यात आला. या रस्त्यासाठी गेली अनेक वर्षे सतत मागणी होत होती. त्यात अनाथाश्रम परिसर हा भाग खोलगट असल्याने दरवर्षी या भागात पावसाळ्यात पाणी साठून राहते. त्यामुळे त्या भागातील रस्ते आरसिसी काँक्रिटचे बनवणे गरजेचे होते. मात्र, कळंब-नेरळ रस्त्यावरून अनाथश्रम भागातील रस्त्यावर डांबरीकरण करण्यात आले. ते डांबरीकरण देखील जून महिना सुरू झाल्यावर केल्याने रस्त्याच्या कामाबद्दल स्थानिकांनी संशय व्यक्त केला आहे. डांबरीकरण करण्याची मुदत शासनाने ठरवून दिलेली असताना बोपेले रस्त्यावर १० जून नंतर डांबरीकरण आले.

## समर्थ बुवा यांचा सत्कार

**अलिबाग :** गंगादेवी भजन मंडळ वायशेत येथील संगित विशारद समर्थ बुवा यांनी गुरुवर्य हरीद्रलोणारकर यांच्यापासून संगित विषयाचे धडे घेऊन वायशेत गावचे नाव जगाच्या काना कोपऱ्यात नेले. याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सिताराम पटील म्हणाले की, समर्थ बुवा हे अलिबागचे रहिवाशी असून त्यांनी नोकरी करुन संगीताचे शिक्षण घेतले. छोटी मोठी भजने करून वायशेत येथे भजन संस्था निर्माण केली. त्यांनी संपूर्ण रायगड सह मुंबई, नाशिक, पुणे, सोलापूर, गुजरात, आंध्र प्रदेश, तिरुपती, तसेच नोकरी निमित्त रशिया येथे गेले असता तेथे ही इंगजीमधून भजन केले. यावेळी समर्थ बुवा मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, संगिताची आवड घराण्यापासून असल्यामुळे मला ही त्याचा छंद लागला. गुरुवर्य लोणारकर बुवांपासून मी धडे घेतले आणि आज या ठिकाणी आलो. सिताराम पाटील यांनी माझा केलेला सत्कार म्हणजे ऐतिहासिक सत्कार मी मानतो, असे ते म्हणाले.

# सिझेरयन शस्त्रक्रिया सुविधा उपलब्ध

**। कोर्लई । वार्ताहर ।**

दुर्गम ग्रामीण भागातील गरजू, गरीब व आदिवासी गरोदर महिलांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन मुरुडच्या ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधीक्षक डॉ. उषा चोले यांच्या मार्गदर्शनाखाली सिझेरियन शस्त्रक्रिया सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

शहरातील प्रसिद्ध स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. मंगेश पाटील, भूलतज्ञ डॉ. तुषार राजपूत यांचे सहकार्य या रुग्णालयास लाभले असून आत्तापर्यंत ३ सिजरियन शस्त्रक्रिया यशस्वीरित्या करण्यात आल्या आहेत. अलिबागच्या जिल्हा सामान्य रुग्णालयाच्यामार्फत प्रसूती कक्ष अत्याधुनिक करण्यात आलेला आहे. या सुविधेबरोबरच गरोदर मातांना जाण्या-येण्यासाठी १०२ रुग्णवाहिका सेवा, मातांच्या दैनंदिन तपासण्या, लसीकरण, औषधोपचार, मोफत आहार, प्रधानमंत्री मातृ वंदना योजना, मातांची मोफत सोनोग्राफी यासारख्या सुविधा रुग्णालयात दिल्या जातात. त्यामुळे सदरच्या अत्याधुनिक प्रसुती कक्ष व इतर सोयी सुविधांचा लोकांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन वैद्यकीय अधिक्षक डॉ. उषा चोले यांनी केले आहे.



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, खाली नमुंद केलेली जमीन खालील जमीन मालक यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली जमीन मिळकत आमचे खरेदीदारांनी विकत घेण्याचे ठरविले असुन त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:-

**मौजे झाप,ता.सुधागड, जि.रायगड. येथील जमीन मिळकत.**

**मिळकतीचे वर्णन :-**

| जमिन मालकाची नांवे | गट/ स.नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| १) श्री.कुमार चिंतामणी थळे.<br>२) सौ.प्रेरणा कुमार थळे.<br>दो.रा.पाली,ता.सुधागड, जि.रायगड. | २३७/१ | ०-२१-०० | ०-६२ |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही वहिवाट ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण बोझा, भाडेपट्टा, जप्ती, लिज, लिएन जाणे येणेचे मार्ग अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. त्याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन त्यासंबंधी कोणाचेही कायदेशीर हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यानी ते जाणीवपुर्वक सोडुन दिले आहेत, असे गृहीत धरून आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करून आमचे खरेदी घेणार खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत बंधनकारक राहणार नाही. हे कळावे. येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

दिनांक :- १६/०६/२०२४

खरेदी घेणार- श्री. यशवंत भिवा नेरूळकर.
रा. हाउस नं.५७७,कोमल सदन बिल्डींग,
एम.आय.डी.सी. तलोजा पावरेकर कंपनी जवळ,
पेंथर गाव, पो.नावडे, ता.पनवेल, जि.रायगड. ४१०२०६.
मो.९३२२६७२६७१

सही/-
खरेदीदारांचे लेखक,
**श्री. सरदारमल जोरावरमल सठोड स्टॅम्प व्हेंडर,**
६९९ जमना निवास, पाली ता.सुधागड, जि.रायगड.
मो. ९४२११६८७६३/९२७०३६७२९०

## पेडणेकर यांची पर्यवेक्षकपदी नियुक्ती



**। मुरूड-जंजिरा । वार्ताहर ।**

मुरुड तालुक्यातील नांदगावच्या श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालयाच्या पर्यवेक्षकपदी विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक प्रतिक रमेश पेडणेकर यांची नियुक्ती करण्यात आली. सहजीवन विद्या मंडळाचे अध्यक्ष फैरोजशेठ घलटे यांनी शाळेच्या पहिल्या दिवशी झालेल्या शिक्षक, कर्मचाऱ्यांच्या एका सभेत या नियुक्तीची घोषणा केली. विद्यालयाच्या पर्यवेक्षिका अर्चना खोत यांची मुख्याध्यापकपदी निवड झाल्यामुळे हे पद रिक्त झाले होते. तसेच, शाळेतील शिक्षक प्रतिनिधी म्हणून योगेश रामदास पाटील यांची तर संतोष रघुनाथ बुल्लु यांची शिक्षकेतर कर्मचारी प्रतिनिधी म्हणून सर्वानुमते फेरनिवड करण्यात आली. याप्रसंगी या सर्वांचे स्वागत शाळेच्या मुख्याध्यापिका अर्चना खोत, मंगेश नांदगावकर, मिलिंद मोहिते, शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका व कर्मचाऱ्यांनी करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## पाणी साठवणीच्या प्रकल्पाचा शुभारंभ

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

'जल है तो कल है' या म्हणीप्रमाणे प्रत्येक ठिकाणी पाण्याचे महत्व सर्वांना कळाले आहे. त्यामुळे शासन विविध स्तरावर 'पाणी आडवा पाणी जिरवा' यासाठी बंधारे बांधून पाणी साठवण्यासाठी प्रयत्न करीत आहे. यातच खोपोली सावरोली हद्दीत नवीनच प्रयोग अमलात आणून टाटा स्टील कंपनीने पावसाच्या पाण्याचे साठवणी करीता नवीन प्रकल्प तयार करीत त्याचा शुभारंभ करून वृक्षांची लागवड केली आहे. या प्रकल्पामध्ये ९ पुनर्भरण खड्ड्यांद्वारे २.२ लाख घन मीटरपेक्षा जास्त पावसाच्या पाण्याचा जलचरामध्ये पुनर्भरणा केला जाईल. यामुळे ताज्या पाण्याचा वापर कमी करण्यात मदत होईल. तसेच, १० जून रोजी टाटा स्टीलने पर्यावरण दिनानिमित्त १५०० पेक्षा जास्त झाडे लावून पर्यावरण दिन साजरा केला. यावेळी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ रायगडचे क्षेत्रीय अधिकारी जयंत हजारे आणि क्षेत्र अधिकारी मीना पवार, खोपोली व होसूरचे कार्यकारी प्लान्ट प्रमुख कपिल मोदी, सरपंच संतोष गणेश बैलमारे हे यावेळी उपस्थित होते.

### जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, मुळ जमिन मालक- १) श्री.जिगर महेंद्र शहा २) श्री. निरज महेंद्र शहा यांच्या मालकीची, ताबेकब्जातील आणि वहिवाटीतील मौजे इसांबे, तालुका खालापूर, जि. रायगड येथील खालील वर्णनाची अकृषिक मिळकत आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे इसांबे, तालुका-खालापूर, जि.रायगड**

| मौजे | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | अकृषीक क्षेत्र (आर-चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| इसांबे | ४८ | ८२ | ८.००.०० | ८०.०० |
| इसांबे | ४८ | ८३ | ७.८०.०० | ७८.०० |

आमचे आशिलांनी वर नमूद मिळकत भोगवटादार/मालक - १) श्री. जिगर महेंद्र शहा २) श्री. निरज महेंद्र शहा यांच्याकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे निश्चीत केलेले आहे. तरी सदरहु मिळकतीचे कोणतेही नोंदणीकृत दस्त करण्यापूर्वी आमचे अशिलांनी सदर मिळकतीमधील संबंधीत मुळ मालक/भोगवटादारकांचे असलेले मालकी हक्क तपासण्याकरीता आमचे अशिलांचे वतीने सदरची जाहिर नोटीस प्रसिध्द करीत आहोत.

तरी वर नमूद मिळकत वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, हजमेन्ट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून २१ दिवसाच्या आत आपल्या हक्क, हितसंबधाचे स्वरूप विषेद करून कागदोपत्री पुराव्यासह खालिल सही करणार यांचे पत्त्यावर लेखी हरकती रजिस्ट्रर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून तसा टायटल रिपोर्ट देण्यात येईल तसेच सदर मिळकतीवर कोणत्याही प्रकारचा दावा हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे आशिल सदर वर नमूद मिळकती नोंदणीकृत खरेदीखताव्दारे हस्तांतरीत करुन घेतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल यांची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण पनवेल
दिनांकः १३/०६/२०२४

सही/-
**ॲड. समीर शांताराम म्हात्रे**
ADD : 102, SHREE BALAJI CO.H.S,
PLOT NO. 98/A/2, SWAMI NITYANAND MARG,
NEAR SARSWAT BANK, PANVEL,
DIST.- RAIGAD, 410206 Mob : 9821657456

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले असून तशी बोलणी आमचे अशिल व विद्यमान जमीन मालकांचे दरम्यान झालेली आहेत व सदरची मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालकांनी दिला आहे. सदर मिळकतीचे मालकी हक्कांबाबतचा शोध घेण्याकरिता व त्या मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणे कामी जाहीर नोटीस प्रसिध्द करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

| मौजे | मिळकत मालकाचे नाव | स.नं./ ग.नं. | क्षेत्रफळ हे.आर. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| सहाण ता.अलिबाग | वसंत काशिनाथ खेडेकर, सुलभा वसंत खेडेकर, समीर वसंत खेडेकर | ५३ | ०-२०-८०<br>पो.ख. ०-०४-००<br>एकुण ०-२४-८० | ५.१२ |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, फरोक्त, पोटगी साठेकरार, वहिवाटीचे जाणेयेणेचे मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून होणाऱ्या १४ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणारे यांचेकडे कळवावे. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनाजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरच्या मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

अलिबाग
दिनांक : १५/०६/२०२४

सही / -
**ॲड. अनिकेत ना. पाटील**
ऑफीस : श्रुती सारंग बिल्डींग,
ऑफीस नं.३, युनियन बँक ऑफ
इंडिया समोर, अलिबाग रायगड,

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, मौजे तळवली, ता. मुरुड, जि. रायगड येथिल खालील वर्णनाच्या मिळकती त्या मिळकतींचे विद्यमान मालक शकील महामुद दरवेश यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याविषयी ठरले असून लवकरच खरेदीखत रजिस्टर करण्यात येणार आहे. सदर मिळकती निर्वेध व बोजाविरहीत असल्याबद्दल खात्री करण्याकरीता ही नोटीस प्रसिद्ध केली आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| अ. क्र. | नाव | मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (आर.चौ.मी.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|---|---|
| १ | शकील महामुद दरवेश | तळवली ता. मुरूड | २६०/३ | ०-३८-०० | ६-९२ |
| २. | शकील महामुद दरवेश | तळवली ता.मुरूड | २६०/१ | १-१५-८<br>पोख ०-२६-०<br>एकुण १-४१-८<br>यापैकी उत्तर दिशेकडील क्षेत्र ०-२०-० | ८-८९ |

सदरच्या मिळकती निर्वेध असल्याबाबत मालकांनी हवाला दिलेला आहे. तरी सदर वर वर्णन मिळकतींवर अथवा तिचे कोणतेही भागावर कुणाचीही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, चार्ज, पोटणी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क साठेकरार व खरेदीखत या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे लेखी स्वरुपात योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत सादर करावी.

याप्रमाणे मुदतीत कुणाचीही तक्रार, हरकत आली नाही तर सदर मिळकती निर्वेध समजून मिळकतींचे मालकाबरोबर रजिस्टर खरेदीखत पूर्ण केले जाईल. त्यानंतर आलेल्या तक्रारी विचारात घेतल्या जाणार नाहीत.

हे कळावे.

ठिकाण : मुरुड
दिनांक : १५/०६/२०२४

सही/-
MP's Consultancy
**श्री. मधुकर पाटील**
१५. त्रिमुर्ती प्लाझा, ए बिल्डींग
बीच रोड. अलिबाग अर्बन बँक समोर,
अलिबाग. ४०२२०१

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे खुजारे ता. श्रीवर्धन, जि. रायगड येथील खाली नमूद केलेल्या व्यक्तींचे नावे असलेल्या ताबे-कब्जातील तसेच मालकी हक्काची खालील वर्णनाची मिळकत आमचे अशिल अमरदीप रमेश भट्टाचार्य रा. गोराई, बोरिवली, मुंबई (मोबाईल नं.९८३३४१९१११) यांनी कायम स्वरुपी खूषखरेदीने घेण्याचे ठरविले असून तशी बोलणी केलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| गट नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पैसे ) | विद्यमान मालक |
|---|---|---|---|
| १८७ | ०-७८-०० | ०.२७ | अनंत गोंविंद तटकरे<br>कल्पेश गोंविंद तटकरे<br>शरद गोंविंद तटकरे<br>शैलेश गोंविंद तटकरे<br>सानिका रुपेश मिरगळ<br>नेहा नितेश साबळे |

वरील वर्णन केलेल्या मिळकत निर्वेध व बोजारहीत असल्याचे मिळकत मालकांचे म्हणणे आहे. तरी सदर मिळकतीवर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, मृत्युपत्र विक्रीचा करार, साठेकरार, पोटगी चार्ज, ताबा वहिवाट, इजमेंट, बोजा, तारण, वारसा, ट्रस्ट, कुळहक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत खाली सही करणार यांचेकडे कागदपत्रे पुराव्यासहीत लेखी कळवावे. तशी कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत तक्रार मुदतीत आमच्याकडे न आल्यास मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अगर अथवा तो असल्यास तो आमच्या अशिलांचे लाभांत सोडून दिलेला आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली तक्रार आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. कळावे.

श्रीवर्धन
ता. १६/०६/२०२४

**ॲड. आदेश सदानंद शिरवटकर**
मु. पो. ता. म्हसळा जि. रायगड
मोबा. नं. ९७६५९९४०५०

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**-मुख्य संपादक**

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

**क्लासिफाईड**
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **बोअरवेल-विहिरीसाठी** मशीनद्वारे अचूक भूजल संशोधन-९२२६७६६१२९
- **प्रथम, पुर्नविवाह, व्यंग,** सर्वजातीय, आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा गणेश महाकाळ ८८८९३५७७५
- **सहारा ट्रॅव्हल्स अलिबाग मध्ये** स्थानिक ड्रायव्हर पाहिजे वय २५ ते ४५( Jsw duty) ९२७०५६०४५६
- **अलिबाग येथे हॉस्पिटलमध्ये कामासाठी** पुरुष कर्मचारी पाहिजेत. योग्य पगार दिला जाईल. डॉ.सरोज तांबोळी मेमोरिअल हॉस्पिटल-रामनाथ. डॉ.अतुल कोतेकर- ७७९८८०७०४, प्रिया कर्णिक-९३७२२०४९७०
- **मांडवा येथे गाडीवर ड्रायव्हर** पाहिजे आहे. मो. ८००७८९३२३२/९४२१९५४३४८

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**

# पेणकरांनो, पाणी जपून प्या!

## तुम्ही पिताय ते पाणी फिल्टरचे की विहिरीचे?

**। पेण । प्रतिनिधी ।**

**जिल्ह्यात खेडेगाव असो वा शहर, जवळपास प्रत्येक घरात आता जारचे पाणी पिण्यासाठी वापरले जात आहे. त्यामुळे पाणी व्यावसायिकांना आर्थिक लाभ होत असला, तरी आणलेले पाणी शुध्द आहे की नाही हे पाहणे ही तितकेच गरजेचे आहे.**




पेण तालुक्यातील पाणी व्यावसायिकांकडे जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली असता सिडकोच्या लाईनमधून, भोगावती नदीतून, विहिरीतून आणलेले पाणी शुध्द करून ते जारमध्ये भरले जाते. व्यावसायिक हे नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेऊन पाणी देत आहेत, असे वाटत असतानाच पेणमध्ये आलेली काविळची साथ आजही कमी होताना दिसत नाही. पाण्याची तपासणी ही सहा महिन्यांनी करणे गरजेचे आहे.

दरम्यान, २९ एप्रिल २०२४ च्या तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अपर्णा खेडेकर यांच्या अहवालानुसार पेणमधील श्रीकृपा एंटरप्रायझेस कामार्ली आणि अल्कलाईन ड्रिकींग पॅकिज्ड वॉटर, अंतोरा रोड आईस फॅक्टरी जवळील हे दोन्ही विक्रेत्यांचे पाणी पिण्यास अयोग्य असल्याचे जिल्हा प्रयोगशाळा अलिबाग यांनी नमूद केले आहे. असे असतानादेखील दोन्ही ठिकाणी पाणी नेण्यासाठी मोठ्या प्रमाणात नागरिक पहायला मिळतात आणि या पाण्याच्या दूषितीकरणामुळेच साथीचे आजार डोके वर काढू शकतात.

डॉ. अपर्णा खेडेकर यांनी वरील दोघांविरूध्द कायदेशीर कारवाई व्हावी यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी रायगड जिल्हा परिषद यांच्याकडे पत्रव्यवहार केला आहे. परंतु मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून कोणतीच हालचाल होताना पाहायला मिळत नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी पेण तालुक्यात काविळसारख्या साथीचे आजार वाढण्याची वाट तर पाहात नाहीत ना, असा सवाल नागरिकांकडून केला जात आहे. व्यावसायिकांनी दर सहा महिन्यांनी पाण्याची तपासणी संबंधित विभागाकडून करून घेणे आवश्यक असते. परंतु किती जण तपासणी करतात, हा ही एक मोठा संशोधनाचा विषय आहे.

### जार व्यवसायावर कंट्रोल कुणाचा?

**जारद्वारे मिळणारे पाणी हे शुध्द असणे आवश्यक आहे. याबाबत पाणी पुरवठा विभाग आणि आरोग्य विभागाचे नियंत्रण असणे आवश्यक आहे. मात्र, असे नियंत्रण या व्यवसायावर आहे की नाही, हा प्रश्न आहे. विशेष म्हणजे, पाणी व्यावसायिकांना अन्न व औषध प्रशासनाकडून रितसर परवाना घ्यावा लागतो. परंतु, अशा प्रकारचा परवाना कित्येकांजवळ नसल्याची चर्चा आहे. जारचे पाणी संबंधित विभागाकडून तपासणी करून घेणे गरजेचे आहे.**

### एक जार ७० रूपयांना

**बिसलेरी पाण्याची एक लीटरची बाटली ही २० रुपयाला मिळते. मात्र, पाण्याचा २० लीटरचा एक जार हा ७० रुपयात मिळत आहे. जार हा घरपोच मिळत असल्याने तो फायदेशीर ठरत आहे.**

### शहरात घराघरात जार

**शहरामधील कार्यालये, घरात जारच्या पाण्याचा वापर अधिक वाढला आहे. जारद्वारे थंडगार पाणी मिळत असल्याने त्याचा वापर हा घराघरात, कार्यालयात होऊ लागला आहे.**

### पाण्यावर कमावतात पाण्यासारखा पैसा

**पाणी ही नितांत गरज आहे. अनेक भागात पाणीटंचाई आहे. त्याचबरोबर सणवार, समारंभ असले की जास्तीचे पाणी लागते. त्यामुळे जारचे आणि बुचबंद बाटल्यांचे पाणी मागविले जाते. त्यामुळे व्यावसायिक पाण्यावर पैसा कमावत आहेत.**

# पावसामुळे राब झाले हिरवेगार

## शेतकरी शेतीच्या कामात व्यस्त



**। पाताळगंगा । वार्ताहर ।**

सात जूनला पावसाने हजेरी लावल्यामुळे शेतकऱ्यांनी पेरणी केली असून, राब हे उत्तम तयार होत आहेत. दिवसातून पावसाच्या तुरळक सरी येत असल्यामुळे राबांना संजीवनी मिळत आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत.

तालुक्यातील शेतकरी शेतीच्या कामासाठी सज्ज झाल्याचे पाहावयास मिळत आहेत. दरवर्षी पाऊस नियोजित वेळेवर पडेल याची शाश्वती नसते. मात्र, यावर्षी ७ जूनला पावसाने हजेरी लावली असून, दररोज राबांचे शिंपणे करीत आहे. त्यामुळे शेतातील राबही चांगले उगवले असून, शेतशिवार हिरवेगार दिसत आहेत.

# अरुण शेलार यांचे निधन

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव नगरपंचायत हद्दीतील खांदाड गावचे रहिवासी सेवानिवृत्त सहकारी सहाय्यक निबंधक अरुण अर्जुन शेलार यांचे गुरुवार १३ जून रोजी दुपारी १.३० वाजता राहते घरी खांदाड माणगाव येथे वृद्धापकाळाने निधन झाले.



मृत्यूसमयी ते ८१ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन भाऊ, एक बहीण, दोन मुले, एक मुलगी, जावई, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने शेलार कुटुंबियांवर शोककळा पसरली आहे. कै. अरुण शेलार यांचा दशक्रिया विधी शनिवार, दि.२२ जून रोजी सोनभैरव मंदिर खांदाड माणगाव येथे, तर उत्तरकार्य विधी मंगळवार २५ जून रोजी राहते घरी खांदाड येथे होणार आहे.

# वाकस येथे अतिसार नियंत्रण सप्ताह



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यात आरोग्यवर्धिनी रुग्णालयात ग्राम आरोग्य स्वच्छता आणि पोषण समुपदेशन सप्ताह साजरा केला जात आहे. त्या माध्यमातून तालुक्यातील वाकस येथील मंदिरात विशेष अतिसार नियंत्रण पंधरवडा साजरा करण्यात आला.

यानिमित्ताने वाकस गावातील गर्भवती महिला, स्तनदा माता यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. त्याचवेळी लसीकरण करण्यात आले असून, ग्रामस्थांचीदेखील आरोग्य तपासणी करण्यात आली.

त्यावेळी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. शयाम पावरा यांनी उपस्थितीत ग्रामस्थांना आरोग्यविषयक काळजी आणि जबाबदारी याबाबद्दल माहिती दिली. त्यावेळी डॉ. कृपाली सोनावळे यांनी महिलांच्या गर्भधारणा काळात घेण्याची काळजी तसेच आपल्या कुटुंबाची जबाबदारी याविषयी मार्गदर्शन केले.

यावेळी जागतिक पर्यावरण संरक्षण सप्ताहानिमित्त उपस्थित मान्यवरांना तुळशीची रोपं भेट म्हणून दिली. नागरिकांना या उपक्रमाचे कौतुक केले आहे.

# नागाला जीवदान

**। कोर्लई । वार्ताहर ।**

मुरुड रस्त्यावर राजवाड्याजवळ असलेल्या तांडेल यांच्या हॉटेलमध्ये शिरलेल्या सहा फुटी नागाला सर्पमित्र संदीप घरत यांनी आपल्या कौशल्याने पकडून जीवदान दिले.



यावेळी वनविभागाचे वनपाल संतोष रेवणे किरण गायकर, मनीष विरकुड, दिनेश रोटकर यांचे सहकार्यही त्यांना लाभले. राजवाड्यानजीक तांडेल यांच्या हॉटेलमध्ये सर्प आल्याची माहिती वनविभागाला देण्यात आली असता वनपाल संतोष रेवणे व त्यांची टीम घटनास्थळी दाखल झाली. त्यांनी तात्काळ सर्पमित्र संदीप यांच्याशी संपर्क साधला. संदीप घरत यांनी येऊन सहा फुटी नागाला पकडून जवळील जंगलात सुरक्षितपणे सोडून जीवदान दिले.

# रोह्यात पावसाची दमदार हजेरी

## धाटाव रस्त्यावर झाड कोसळल्याने वाहतुकीचा खोळंबा

**। धाटाव । वार्ताहर ।**

मान्सून कोकणात दाखल झाल्यानंतर रत्नागिरी, रायगडसह रोह्यातसुद्धा पावसाने दमदार हजेरी लावली आहे. अधून-मधून विजांचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह दाखल झालेल्या पावसाने सर्व परिसर ओला चिंब केला आहे. मात्र, झाडांच्या खाली माती भुसभुशीत होऊन काही ठिकाणी झाडे उन्मळून पडत आहेत. असाच एक प्रकार रोह्यात धाटाव औद्योगिक वसाहतीतील अंतर्गत रस्त्यावर मध्यरात्रीदरम्यान झाड उन्मळून कोसळले.



झाड अचानक रस्त्याच्या मधोमध उन्मळून पडल्याने मलखंडवाडी, महादेववाडी बाजूकडील रहदारी ठप्प झाली. दरम्यान, या घटनेमुळे अवजड वाहनांसह, टँकर, चारचाकी वाहने रस्ता बंद झाल्यामुळे वाहतूक कोंडीसुद्धा झाली नाही. सुदैवाने या घटनेत जीवितहानी मात्र टळली. पहाटे पहिल्या पाळीत कामावर जाणाऱ्या कामगारांना रस्त्यात पडलेल्या आडव्या झाडामुळे पर्यायी रस्ता निवडावा लागला.


तर यामुळे अनेकांना कामावर उशिरा जावे लागले तर रात्र पाळीत काम करणाऱ्या कामगारांनासुद्धा येथे झालेल्या वाहतून कोंडीचा सामना करावा लागला. दरम्यान, धाटाव येथील अग्निशामक दलाच्या जवानांनी याठिकाणी तत्परता दाखवीत हे झाड तासाभरात बाजूला केले.

अखेर या रस्त्यावरील वाहतूक पूर्वपदावर आणण्यात आली. औद्योगिक वसाहतीतील कामगारवर्गाने अग्निशामक दलाच्या जवानांच्या कामाचे कौतुक केले.

# साप्ताहिक राशिभविष्य दि. १६ जून ते २२ जून २०२४

**ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग**
**मोबा.९४०४७९१७९८**

## स्वत:ला शोधा




**मेष :** मेष राशीधारकांना आपले ग्रहमान पाहता या कालावधीत तुम्ही स्वत: बरोबरही वेळ घालवला पाहिजे कारण यामुळे तुम्हाला आंतरिक मजबुती मिळेल आणि तुमची इच्छाशक्ती वाढेल. परदेशात जाण्याची इच्छा असणाऱ्यांना या सप्ताहात काही चांगली बातमी मिळू शकेल आणि पूर्वी केलेल्या मेहनत आणि परिश्रमांचे निकाल आता सहज मिळू शकतात. काही लोकांना वडिलोपार्जित मालमत्ता मिळण्याचीही शक्यता आहे. आपल्या पालकांच्या आरोग्याची काळजी घ्या, सप्ताहाचा मधला कालावधी व्यापारी वर्गासाठी चांगले राहील. परदेशी सहल देखील होऊ शकतात. जे लोक नोकरी करीत आहेत त्यांची अचानक बदली होण्याची शक्यता आहे. ज्यामुळे ते थोडे विचलित होऊ शकतात. आपण कोणत्याही तीर्थयात्रसाठी देखील जाऊ शकता तसा योग आहे. गेल्या काही दिवसापासून सुरू असलेल्या काही समस्या कमी होतील. **महिलाना-** दुसऱ्यांवर अवलंबून न राहता आपल्या आत्मविश्वासाने स्वयंसिद्ध होण्याचा प्रयत्न केल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करू शकाल. डोक्यातला राग दाबून ठेवू नका, रक्तदाबाची काळजी घ्या. **शुभ दिनांक-** १७,१८

## संकट दूर होईल



**वृषभ :** वृषभ राशीसाठी या सप्ताहातील ग्रहमान पाहता काही अपूर्ण कामे पूर्ण झाल्यामुळे आराम मिळेल आणि काही नवीन कामेही सुरू करता येतील. तुम्ही बऱ्याच काळापासून असलेल्या संकटातून मुक्त व्हाल आणि एक नवा अध्यायाचा श्री गणेश कराल. या कालावधीत या राशीच्या जातकांना दु:खापासून आराम मिळेल आणि जीवनाच्या चक्रात आनंदाची प्राप्ती होईल चालू कालावधी आपल्याला अनेक प्रकारच्या यात्रांमध्ये व्यस्त ठेवेल, परंतु ही यात्रा शुभ आणि कल्याणकारक असेल ही आनंदाची बाब आहे. आपण आपल्या कुटुंबातील सदस्यांसह आकर्षक आणि सुंदर पर्यटन स्थळावर प्रवास कराल. आपण जीवनाच्या नवीन टर्निंग पॉइंटमध्ये प्रवेश कराल जिथे आपणास पाहिजे तसे करण्यास भरपूर स्वातंत्र्य मिळेल. आपण आपल्या ऊर्जेसह आपल्या कामात यश मिळवाल. **महिलाना-** आप्तेष्टांच्या संपर्कात राहता येईल व त्यांची ख्याली-खुशाली घेता येईल. आर्थिक बाजू ठीक राहील. कौटुंबिक वातावरण बिघडू देऊ नका. सार्वजनिक ठिकाणी आपले मतप्रदर्शन करण्याचे टाळावे. पर्स फुगलेली राहील, खर्चासाठी रक्कम येईल. **शुभ दिनांक** - १९,२०

## नवीन शिकण्याची संधी




**मिथुन :** मिथुन राशीसाठी आपले ग्रहमान पाहता या कालावधीत बरेच रोमांचक अनुभव घ्यायला मिळतील आणि काहीतरी नवीन शिकण्यासही मिळतील. या सप्ताहात आपण बऱ्याच ठिकाणी सहली करणार असाल पण ट्रिप्समुळे आपल्या आरोग्यावर परिणाम होऊ शकतो हे आपण लक्षात ठेवले पाहिजे, म्हणून संपूर्ण नियोजनासह सहलीला जा. विशेषतः ही वेळ असेल जेव्हा आपण वाहन काळजीपूर्वक चालवावे आणि आपल्या खण्यापिण्यावर विशेष लक्ष द्यावे, त्या व्यतिरिक्त आपल्याला दुसऱ्याच्या भांडणात जाणे टाळावे लागेल आणि मांस, मद्यपान आणि धूम्रपान करण्यासारख्या व्यसनांपासून दूर राहावे लागेल. तरीही हा कालावधी आपल्यासाठी खूप चांगला आणि महत्त्वाचा दिसत आहे. काहीतरी नवीन शिकण्यासाठी आपल्याला काही नवीन आव्हानांना सामोरे जावे लागेल. बऱ्याच प्रकरणांमध्ये आपल्याला बऱ्यापैकी मोकळेपणाने आणि नवीन गोष्टी शिकण्यात रस वाटेल. **महिलांना-** आपल्या आवडीच्या गोष्टी करण्यात आनंद घेता येईल. दूरच्या आप्तेष्टांशी वार्तालाप होण्याची शक्यता आहे. **शुभ दिनांक-**२१,२२.

## सहकार्य मिळेल




**कर्क :** कर्क राशीधारकास या सप्ताहात आपण आपल्यासाठी हे दिवस संभाव्यतेचे आहेत आणि आपल्या स्वतःस प्रत्येक कठीण उद्दिष्ट साध्य करण्याची क्षमता निर्माण होणार आहे. आपल्या भावंडांशी चांगला संबंध ठेवा आणि वादविवाद होऊ देऊ नका. लक्षात ठेवा आपण फक्त भावंडांच्या मदतीने पुढे जाऊ शकाल. आपणास अशा मित्रांचे सहकार्य देखील मिळेल जे आपल्याला सकारात्मक विचारसरणीसह पुढे जाण्यास प्रोत्साहित करतील. दुसऱ्यांवर अवलंबून न राहता स्वयंसिद्ध होण्याचा प्रयत्न करा. नोकरदारांनी वरिष्ठांशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करावा, वादाचे प्रसंग टाळावेत.आपली आई मामा कडील माणसे घरी येतील त्यांची ऊठबस करावी लागेल, **महिलांना-** वैवाहिक जोडीदाराशी जुळवून घ्या. आपल्या ध्येयासाठी प्रयत्नशील राहा.. नको त्या जबाबदाऱ्या स्वीकारू नका महिलांना- प्रकृतीस्वास्थ्य जपा. विरोधकांच्या कारवायांवर नजर ठेवा. आपल्या घरात एखादी किमती वस्तूची खरेदी होणार आहे. मोठ्या व्यक्तिनचे रागाचे बोलणे मनावर घेऊ नका. आपल्या रागावर नियंत्रण ठेवून शांतता बाळगल्यास आपण सर्व बाबतीत अग्रेसर राहू शकाल. **शुभ दिनांक** -१६,१७

## प्रोत्साहन मिळेल




**सिंह :** सिंह राशीसाठी या सप्ताहात आपल्या कामाची प्रशंसा केली जाईल. या कालावधीत आपण खूप आशावादी असाल आणि स्वत:च्या विश्वासामुळे पुढे जाण्यासाठी आपल्याला अनेकांकडून प्रोत्साहित केले जाईल, परंतु त्यामध्ये कोणतेही काम करण्यापूर्वी आपण पुरेशी तयारी करणे आवश्यक आहे हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. या सप्ताहात आपल्याला मुख्यतः आपल्या आरोग्यावर लक्ष केंद्रित करावे लागेल कारण कदाचित ही तुमची कमकुवत बाजू असेल. अचानक बदलणारे वातावरण आपल्या आरोग्यावर परिणाम करू शकते. नियमित आणि चांगल्या दिनचर्या पाळा आणि निरोगी राहा. परंतु आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की अत्यधिक आवेगाने कार्य केल्याने आपल्या सभोवतालच्या लोकांवर परिणाम होईल, म्हणून संयमाने काम करा. आपल्याला बरेच कठीण कार्ये पूर्ण करावे लागतील ज्यामुळे आयुष्यात पुढे जाण्यासाठी मार्गदर्शन आणि प्रेरणा मिळेल.**महिलांना-**ह्या दिवसांत आरोग्यास विशेष काही त्रास होण्याची शक्यता नसली तरी पहिल्या दोन दिवसात पोटात जळजळ, पायांच्या स्नायूंचे दुखणे होण्याची शक्यता आहे. **शुभदिनांक-**१९,२२

## भरभराटीचा काळ



**कन्या :** कन्या राशीसाठी या सप्ताहात शनी राशीच्या या कालावधीत परदेशी सहलींचे योग बनले आहेत, म्हणून जर तुम्ही आताच या दिशेने प्रयत्न करीत असाल तर या वेळेचा पुरेपूर फायदा घेण्यास तयार व्हा. जर आपण लहान व्यवसाईक असाल तरी आपल्याला या कालावधीत बदलीचे योग आहेत, आपण आपल्या घरापासून दूर काम करत असल्यास, यावर्षी आपण आपल्या घराजवळ येऊ शकता. जर आपला एखादा व्यवसाय असेल तर आपल्याला त्यासंदर्भात बरेच प्रवास करावे लागेल जेणेकरून आपला व्यवसाय संबंध दृढ होईल. आपण कोणत्याही सर्जनशील कामात व्यस्त असल्यास हा सप्ताह भरभराटीचा जाऊ शकतो. या कालावधीत आपल्याला काही किरकोळ त्रास आणि अडचणींना सामोरे जावे लागेल आणि काही कठीण आव्हानांवर मात करावी लागणार आहे. आपण खूप उत्साहित व्हाल आणि आपल्या ऊर्जेच्या मदतीने प्रत्येक आव्हानाचा सामना कराल आणि त्यास यश मिळवाल. सुरवातीलासंसर्गजन्य आजारा पासून तब्बेत सांभाळा,**महिलांना** घरबसल्या हा काळ उत्तम असून त्यांच्या कलागुणांना वाव मिळेल. **शुभदिनांक-** १६,१८ .

## संधीचे सोनं करा




**तुळ :** तुल राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता व्यवसायामध्ये आपण नावलोकीक मिळवू शकता. चालू कालावधी आपल्यासाठी एक मैलाचा दगड ठरू शकेल कारण आपण आपल्या क्षेत्रात चांगले यशस्वी होण्याची अपेक्षा करू शकता. म्हणून प्रत्येक संधीचे भांडवल करण्यास सज्ज व्हा आणि उच्च यश मिळवा.म्हणून नोकरी मिळवण्यासाठी जर आपण या दिशेने प्रयत्न करीत असाल तर आपले प्रयत्न थोडेसे वाढवा आणि देवाच्या कृपेने आणि आशीर्वादाने आपण याकालावधीत एक चांगली नोकरी मिळेल सोबत जीवनसाथी मिळवू शकाल. या राशीच्या लोकांच्या व्यवसाय भागीदारीमध्ये ग्रहांच्या प्रभावाचा बराच फायदा होईल, आपली आर्थिक गुंतवणूक करताना तुम्ही बरेच गृहपाठ केले पाहिजे, तरच तुम्ही त्या कामात यशस्वी व्हाल. **महिलांना-** घरातील अनावश्यक खर्चाला आळा घाला त्यामुळे मनावर ताण येणार नाही आपण बोलण्यावर नियंत्रण ठेवून कृतीवर भर दिल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येतील. नोकरदारांना दिलासा मिळेल. कलाक्षेत्राला चांगले प्रोत्साहन मिळेल, **शुभ दिनांक-** १७,१९

## मनोबल वाढेल




**वृश्चिक :** वृश्चिक राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपल्याला काही नवीन संधी मिळतील आणि त्या संधीमुळे आपल्याकडे संपूर्ण ऊर्जा आणि तग धरण्याची क्षमता देखील वाढलेली असेल. आपण आपला हात ज्या कार्यात ठेवाल त्यात आपल्याला यश मिळेल आणि आपले सर्व उद्योग सुरळीत चालू होतील. या कालावधीत सुरुवातीस आपण कमी अंतराच्या ट्रीप जास्त कराल आणि आपल्याला यामुळे फायदाही होईल. सप्ताहाच्या सुरुवातीस आपण यात्रेवर देखील जाऊ शकता. या व्यतिरिक्त, सामाजिक कार्याशी संबंधित कामकाजामुळे आपण काही सहली देखील करू शकता. आपले परदेशी जाण्याची चांगली शक्यता आहे. यावेळी आपल्या बऱ्याचदिवसांपासून प्रलंबित असलेल्या इच्छा पूर्ण होतील, ज्यामुळे तुमचे मनोबल देखील वाढेल. या दरम्यान आपण आपले घर तयार करण्यासाठी किंवा मालमत्ता खरेदीसाठी कर्ज घेऊ शकता. **महिलाना-** नको त्या विचारात अडकू नका. तब्बेत ठीक वाटत नसेल तर प्रवास टाळा, मित्र, मैत्रिणी खुशखबर देतील. सप्ताहाच्या मध्यावर धनलाभ संभवतो. **शुभदिनांक-** १८,२०

## अहंकार सोडा



**धनु :** धनु राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण या राशीचे लोक प्रेमाच्या बाबतीत खूप रोमँटिक असतात आणि एखाद्यावर मनापासून प्रेम करतात. या व्यक्तींना आपल्या अहम आणि आवेगावर नियंत्रण ठेवणे गरजेचे असेल कारण हेच सर्व पुढे तुमच्या लव्ह लाईफमध्ये अडचणी आणू शकतात. आपण त्यावर नियंत्रण ठेवण्यास सक्षम असावे म्हणून या सप्ताहात आपला अहंकार बाजूला ठेवा आणि आपल्या जोडीदारावर प्रेम करा. नकोत्या विचारातअडकूनका. तब्बेत ठीक वाटत नसेल तरप्रवास टाळा, मित्र, मैत्रिणी खुशखबर देतील. सप्ताहाच्या मध्यावर धनलाभ संभवतो. ह्या सप्ताहात आरोग्यास विशेष काही त्रास होण्याची शक्यता नसली तरी पहिल्या दोन दिवसात पित्त प्रकोप, पोटात जळजळ, पायांच्या स्नायूंचे दुखणे होण्याची शक्यता आहे **महिलांना**-. कामात असताना तब्बेतिकडे दुर्लक्ष करू नका, झोप व खाणे वेळेवर करा, आपण आपली अस्मिता शुल्लक कारणाने दुखावली जाणार नाही याची दक्षता घेतल्यास आपल्या मनाप्रमाणे पुष्कळशा गोष्टी साध्य होणे शक्य आहे. **शुभदिनांक-** १९,२१

## इच्छा पूर्ण होतील




**मकर :** मकर राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहताया राशीच्या जातकांना मिश्रित निकाल मिळेल. या कालावधीत आपले समंजस पणाचे कौशल्य वाढेल आणि त्यामुळे नातेसंबंध वाढतील आणि आपण निसर्ग आणि आयुष्यातून बरेच काही शिकू शकाल. काही नवीन मित्रही बनतील. सुरुवातीला या काळात आपण भविष्यासाठी बऱ्याच योजना तयार कराल ज्यामध्ये आपणास यश मिळेल आणि आपल्या बऱ्यापैकी प्रलंबित इच्छा पूर्ण होतील. आपण या कालावधीत आपल्या जीवनात प्रेमाचे आणि प्रणयरम्यतेचे स्वागत करण्यास तयार असावे. जर आपण आधीपासूनच घरघूती नात्यात असाल किंवा एखाद्यामाहितीचा शोध घेत असाल तर या प्रकरणात आपल्याला आनंद देण्यासाठीआपले ग्रह कार्य करतील. याकालावधीत आपले विवाह देखील होण्याची शक्यता आहे.महिलांना-तरीही ग्रहमान पाहता आपण प्रत्येक कार्यात शांतता बाळगून, विचारपूर्वक वागून निर्णय घेतल्यास हा सप्ताह तुमच्या दृष्टीने चांगला जाईल.महिलावर्गाला सासुरवाडीकडून काही शुभसंकेत मिळतील. **शुभ दिनांक**-२०,२२ .

## योग्य व्यवस्थापन करा



**कुंभ :** कुंभ राशी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपले बरीच महत्त्वपूर्ण पदांवर बसलेल्या लोकांशी संबंध स्थापित केले जातील, जे भविष्यात आपल्यासाठी उपयुक्त ठरतील. या कालवधीत आपण खूपच स्वतंत्र अनुभवाल आणि अनेक निर्णय घ्याल पण आपणास हे लक्षात ठेवले पाहिजे की, कधीकधी आपले निर्णय चुकीचे असू शकतात, म्हणूनच काही ज्येष्ठ आणि अनुभवी व्यक्तीच्या सल्ल्यानेच कार्य करा अन्यथा नफ्याच्या ठिकाणी तोटा होण्याची शक्यता आहे. जर आपण चांगले व्यवस्थापन केले तर हा कालावधी आपल्या आयुष्यातील सर्वोत्तम कालावधी पैकी एक असेल. म्हणून या दिवसांमध्ये आपण वाहन विकत घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे जेणेकरून आपण एका चांगल्या वाहनाचे मालक होऊ शकता. या दिवसांत, आपण उच्चस्तरावर आनंदाचा आनंद घ्याल आणि आपल्या सुविधांवरही चांगला खर्च कराल. मुलांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करावा. **महिलांना-** हा कालावधी आपल्यासाठी पायघड्या घालून ठेवलेला असेल जे कराल त्यात यश मिळू शकते पैसा जपून ठेवण्यास शिका. शुभ दिनांक- १६,१८ .

## प्रगतीचा कालावधी



**मीन :** मीन राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण आपल्या वडिलांशी संबंध सुधारण्याचा प्रयत्न करा यामुळे फक्त तुम्हाला नशिबाची साथच मिळणार नाही तर तुमची प्रगती देखील भरपूर होईल. या सप्ताहात तुम्हाला काही कठीण निर्णय घ्यावे लागतील कदाचित यामुळे तुम्ही दुखावले जाऊ शकता. तुमच्याकडे प्रत्येक कठीण काळात आणि आपल्या मनोबलातून बाहेर पडण्याची क्षमता तुम्हाला सक्षम बनवू शकते. जरी आपल्याला असे निर्णय घ्यावे लागले तरीही घाबरू नका कारण हे आपल्या भविष्यासाठी खूप चांगले आहे. एकंदरीत, हा कालावधी या राशीच्या लोकांना मिश्रित परिणाम देईल आणि आपण आपल्या मनोबल आणि परिश्रमांच्या बळावर बरेच लक्ष्य साध्य करू शकता. आपण आपल्यातील काही कमतरता दूर करून यशस्वी व्यक्ती म्हणून उदयास व्हाल. **महिलांना**-हा असा एक सप्ताह असेल ज्यात आपल्यास साहस असेल प्रेम असेल आणि आपल्या प्रियजनांचा साथ ही असेल. आपल्याला आपली क्षमता त्याच्या पूर्ण संभाव्यतेसाठी आणि या कालावधीसाठी वापरावी लागणार आहे. वैवाहिक जोडीदाराशी जुळवून घ्या. आपल्या ध्येयासाठी प्रयत्नशील राहा. **शुभ दिनांक-** १७,२०

मोहोर


# देशाच्या विकासासाठी सहमतीचे राजकारण हवे!

> ज्या पद्धतीने महाराष्ट्रातल्या पक्षांमध्ये तोडफोड, पळवापळवी, अर्धा पक्ष, तुकड्यांचा पक्ष, आयात करण्याचा खेळ केला गेला, त्याचे प्रत्यंतर संपूर्ण देशांनी पाहिले. महाराष्ट्राच्या जनतेला तर राजकीय गोष्टींबाबत तर चीडसुद्धा निर्माण झाली. एवढे करुन भाजपाने अनेकांची अवस्था 'धोबी का कुत्ता' अशी करुन टाकली आहे. सर्वसामान्य जनतेला मंत्रिमंडळ जाहीर झाले काय आणि नाही काय, याचा फरक पडण्याची गरज नाही. एनडीएचे सरकार तर एनडीएचे सरकार, हुकूमशाही, मुजोरी सरकार नसावे, हीच अपेक्षा! दररोजच्या त्रासातून, महागाईतून मुक्तता मिळावी, जीवन सुसह्य व्हावे, एवढीच माफक अपेक्षा आहे. निवडणुकांच्या दरम्यान, प्रचाराच्या दरम्यान एकमेकांना उणेदुणे काढणाऱ्या गोष्टींचा शेवट होणे गरजेचे आहे.



आचार-विचार
डॉ. विलास पवार

१ जून २०२४ पुन्हा एकदा नवीन केंद्रिय सरकारचा कारभार सुरु झाला. पुन्हा एकदा म्हणजे तिसऱ्यांदा मोदी पंतप्रधान झाले. सगळे काही आता नवीन आहे. पंतप्रधान सुद्धा नव्याने झाल्यासारखेच आहेत. नाविन्यसुद्धा किती लवकर आत्मसात करावे याचे उदाहरण म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी! एनडीएच्या बैठकीत भाजप सरकार असे म्हणल्याशिवाय भाषण न करणाऱ्या मोदींनी एकदासुद्धा भाजप सरकार असे म्हटले नाही. त्यांनी बैठकीमध्ये एनडीए सरकार असा उल्लेखच वारंवार केला आहे. हे बदल, निर्माण झालेले नाविन्य खरंतर इतक्या सहज आणि सातत्याने पाळणे सोपे नाही. मोदींना देशाच्या राजकारणांमध्ये टिकून राहायचे असल्यामुळे त्यांची कार्यपद्धती विचार करून पावले टाकणारी असेल यात वादच नाहीय २०१९ मध्ये भाजपाला ३०३ जागा मिळाल्यामुळे मोदींनी एनडीएतील घटक पक्षांना विचारले नव्हते, घटक पक्षांच्या नेत्यांकडे त्यांनी लक्ष सुध्दा दिले नाही; पण आता परिस्थिती बदलली आहे. आता संविधान सदनामध्ये मोदी आणि अमित शहा हे दोघेही घटक पक्षातील खासदारांशी संवाद करताना हातात हात घेताना दिसत होते. पण त्या अगोदर गेल्या दहा वर्षात एक वेगळी वागणूक या खासदारांनी अगोदर पाहिली होती. मोदी आणि शहा यांच्यापलिकडे निर्णय कोण घेणार नाही पण आता स्थिती बदलली आहे लोकसभेत दहा वर्ष विरोधीपक्ष नेता अस्तित्वात नव्हता. २०१४ आणि २०१९ मध्ये विरोधी पक्षातील मोठा पक्ष काँग्रेस निर्विवादपणे होता. परंतु विरोधी पक्ष नेत्यासाठी किमान दहा टक्के जागा काँग्रेसला जिंकता आल्या नव्हत्या. २०२४ निवडणुकीने तर दहा वर्षांत घडी बसलेल्या अनेक बाबींना विस्कळीत केले आहे. अमर्याद सत्ता काय याचा अनुभव मोदी आणि शहांनी गेल्या दहा वर्षात घेतला आहे. पण, आता २४० भाजपा सदस्य लोकसभेत आहेत. अन्य पक्षांतील आयाराम गयाराम शोधून, तोडाफोडीचे तंत्र वापरुन खासदार फोडण्याचे आता तरी भाजपा करणार नाही. तोडाफोडीच्या तंत्राचे निवडणुकीच्या निकालाने तोंड चांगलेच फोडलेले आहे. त्यामुळे तेलगु, देसम, आणि जनता दल (सं) या दोन पक्षांच्या सहाय्याने, मदती-वर अवलंबून राहावे लागेल. या पक्षांचे नेते चंद्राबाबू नायडू आणि नितेश कुमार हे आहेत. दोन्ही नेते मुरलेले आणि कसलेले आहेत. कोणत्या वेळेला ते अदलाबदली, आलटपालट करतील हे कोणीही सांगू शकणार नाही. या दोघा 'बांबूनी' दगाबाजी केली तर भाजपा असलेले एनडीए सरकार कोसळू शकते. गेली दहा वर्षे केंद्र सरकार आणि सत्ताधारी पक्ष असलेल्या भाजपावर कोणताच अंकुश नव्हता. विरोधी पक्षनेता नाही, संसदीय हत्याराचा वापर, लोकशाहीने दिलेल्या अधिकाराचा वापर केंद्र सरकारवर करता येत नव्हता. एक असे बहुमत जे संसदेमध्ये विरोध करण्यासाठी शिल्लक नव्हते. जे होते, ते जेमतेम होते. एका अर्थाने, संसदीय लोकशाही निष्प्रभ झाल्याचे चिन्ह होते आणि ती परिस्थिती बदलली आहे. आपल्याच पक्षातील मंत्र्यांना सर्वोच्च नेतृत्वाने सांगितल्यावर चर्चा न करता सही करण्याची पद्धत होती, आता ती असणार नाही. घटक पक्षांशी चर्चा करुनच निर्णय घ्यावे लागतील. आज सत्तारुढ पक्षातले खासदार आवाजाने बहुमत सिद्ध करायचे अगोदरसारखे यशस्वी होणार नाहीत. कारण, विरोधी बाकांवरसुद्धा अडीचशे सदस्य असणार आहेत. संसदेत विरोध करणाऱ्या सदस्यांना गोंधळ करतात. म्हणून निलंबन करणेसुद्धा आता सोपे असणार नाही. निवडणुकीतून जो निकाल समोर आला आहे, जनमत स्पष्ट झाले आहे. त्याचा विचार एनडीए सरकार चालवणाऱ्या भाजपाला नक्कीच करावा लागेल. विरोधात आव्हान देणारे नवीन-जुने सदस्य संसदेत चर्चा आणि वातावरण हे दोन्ही गरम करु शकतील.



महाराष्ट्रातील खासदार सत्तारुढ आणि विरोधी अशा दोन्ही जागांवर असतील; परंतु सगळ्यात जास्त कुचंबणा महाराष्ट्रातील सत्तारुढ पक्षाच्या बाजूने असलेल्या शिंदेच्या सात खासदारांची आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे निवडून आलेले सदस्य सुनिल तटकरे यांची आहे. या आठही मूळ पक्षांपासून स्वतंत्र झालेल्या पक्षांना भाजपा स्वतंत्र अस्तित्व देणार की नाही, हासुद्धा प्रश्नच ठरणार आहे. एनडीएमध्ये हे आठ खासदार आहेत, पण त्याच्या अस्तित्वाचा उपयोग नाही, असे भाजपाने सिद्ध केले आहे. एक राज्यमंत्रीपद शिंदेंच्या शिवसेनेला आणि एक राज्यमंत्रीपद अजित पवारांच्या राष्ट्रवादीला देऊन भाजपाने महाराष्ट्रावरच सूड उगवलेला दिसतो आहे. एकनाथ शिंदे यांनी भाजपा नेस्तनाबूत होत असताना, तिकीट वाटपात हस्तक्षेप असताना, उशिरा उमेदवार घोषित करुनसुद्धा सात खासदार निवडून आणले. त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा मान भाजपाने राखायला हवा होता. कॅबिनेट मंत्री दर्जाचे एक पद तरी त्यांना द्यायला हवे होते. तसं पाहायला गेले तर एकमेव खासदार निवडून येऊनसुद्धा मोदींच्या अर्थात एनडीएच्या सरकारमध्ये कॅबिनेट मंत्री दर्जाचे पद देण्यात आले आहे. जनता दल (ध) एच डी कुमारस्वामी हिंदुस्थान आवामी मोर्चाचे जीतन मांझी हे त्यांच्या पक्षाचे एकमेव खासदार आहेत, पण त्यांना कॅबिनेट मंत्रीपद देण्यात आले. अपना दलाच्या अनुप्रिया पटेल यासुद्धा एकमेव खासदार आहेत. राष्ट्रीय लोकदलाचे एक दोन खासदार निवडून आले, त्यांना राज्यमंत्रीपद दिले आहे. आपल्या रामदास आठवलेंचा पक्षाचा एकसुद्धा खासदार नाही, तरीसुद्धा त्यांना राज्यमंत्रीपदाचा मान दिला आहे. (ही गोष्ट निराळी की रामदास आठवले गेली अनेक वर्ष जाहिरपणे कॅबिनेट दर्जाची मागणी करीत आहेत. कदाचित दक्षिणेकडील किंवा उत्तरेकडील राज्यात ते असते, तर ही मागणी कदाचित पूर्ण झाली असती.)

नरेंद्र मोदींच्या तिसऱ्या मंत्रिमंडळात ३३ जणांनी पहिल्यांदा केंद्रात मंत्रीपदाची शपथ घेतली आहे. केंद्रीय मंत्रिमंडळात ८१ मंत्र्यांचा समावेश करता येऊ शकतो. आता ७२ मंत्र्यांचा समावेश केला गेला आहे. याचा अर्थ, विस्तार केला जाऊ शकतो. याबाबत साशंकता आहे. एकनाथ शिंदे, अजितदादा पवार यांची भाजपाला आता उपयुक्ता नाही का? अशी कुजबूजसुद्धा ऐकू येत असेल तर नवल नसावे. ज्या पद्धतीने महाराष्ट्रातल्या पक्षांमध्ये तोडफोड, पळवापळवी, अर्धा पक्ष, तुकड्यांचा पक्ष, आयात करण्याचा खेळ केला गेला, त्याचे प्रत्यंतर संपूर्ण देशांनी पाहिले. महाराष्ट्राच्या जनतेला तर राजकीय गोष्टींबाबत तर चीडसुद्धा निर्माण झाली. एवढे करुन भाजपाने अनेकांची अवस्था 'धोबी का कुत्ता' अशी करुन टाकली आहे. सर्वसामान्य जनतेला मंत्रिमंडळ जाहीर झाले काय आणि नाही काय, याचा फरक पडण्याची गरज नाही. एनडीएचे सरकार तर एनडीएचे सरकार, हुकूमशाही, मुजोरी सरकार नसावे, हीच अपेक्षा! दररोजच्या त्रासातून, महागाईतून मुक्तता मिळावी, जीवन सुसह्य व्हावे, एवढीच माफक अपेक्षा आहे. निवडणुकांच्या दरम्यान, प्रचाराच्या दरम्यान एकमेकांना उणेदुणे काढणाऱ्या गोष्टींचा शेवट होणे गरजेचे आहे. सरसंघचालक मोहन भागवत यांनी सत्ताधारी विरोधकांना केलेल्या आवाहनाकडे लक्ष द्यायला हवे. सहमतीचे राजकारण असावे, असे सरसंघचालक मोहन भागवत आवाहन करीत आहेत. ते सर्व पक्षांनी देशाच्या विकासासाठी ऐकायला पाहिजे व तो विचार अवलंबला पाहिजे. सुरुवात करायची तर भाजपाने करायला हवी. सुरुवात स्वत:पासून करायला हवे. राजकारण द्वेषाचे, तोडाफोडीचे यापैकी कशाचे नसावे, मग ते राजकारण सहमतीचे असले काही, बारामतीचे असले, अगदी साबरमतीचे असले तरी, देशातली जनता सुखाचा अनुभव घेऊ शकेल. वैचारिक स्वातंत्र्य, धार्मिक, स्वातंत्र्य, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि अभ्यासू टीकेचा अव्हेर केला जाऊ नये. देशातील जनता आचार विचार यांनी निर्भय राहिली तर त्या देशाचा विकास कोण थांबवणार नाही. **

---

# मीठ आणि जीवन

कोंकणस्पंदन
धनंजय शेट्ये

आपल्या आहारात नेहमीच परिचयाचे आणि अत्यावश्यक म्हणजे 'मीठ' होय. मीठाशिवाय जेवण हे बेचव होऊन जाईल. पण मीठाचे ठराविक प्रमाण असावे लागते. ते कमी अथवा जास्त झाले तर परत चव बिघडते. 'खाल्ल्या मिठाला जागणे' हा वाक्प्रचार मराठी भाषेत रुढ आहे.एखाद्याचे केलेल्या उपकाराची संकटसमयी परतफेड केली की लोक म्हणतात, 'खाल्ल्या मिठाला जागला'. तसेच 'मीठाचा खडा पडणे' म्हणजे चांगले सहसंबंध असताना एखाद्या क्षुल्लक कारणावरून वाद झाल्यानंतर लोक म्हणतात, ' दुधात मीठाचा खडा पडला'. बॉलीवुडमधील सुप्रसिद्ध माईलस्टोन ठरलेल्या ' शोले' चित्रपटांमध्ये कालिया गब्बर सिंगला सांगतो,

''सरदार गलती माफ करो मैने आपका नमक खाया हैं'

एखादा माणूस एखाद्याच्या घरचं अण्ण खातो त्या खाल्लया अण्णाला जागणे,उपकाराबद्दल कृतज्ञ राहणे यासाठी 'तुमच्या घरचं मीठ खाल्लं आहे, कसा विसरेन?' असे बोलतो. एकंदरीत काय तर जेवणात मीठ असायचं.

पूर्वीच्या काळात तिन्हीसांजेला म्हणजे संध्याकाळी मावळतीच्या वेळेला कोणाजवळ मीठ उसणं मागायला जायचं नसतं असा रिवाज होता. तसेच संध्याकाळी बाकी सर्व वस्तू उसण्या दिल्या घेतल्या जायच्या पण मीठ मात्र कधी दिलं जातं नसायचं. काल आजपर्यंत दुकानदारही आपल्या दुकानातलं मीठ संध्याकाळच्या वेळी देत नसतं. पण नंतर नंतर स्वतःच्या हाताने देत नसतं तर दुकानातील वस्तू विकाताना अंधश्रद्धेमुळे नाकारता येत नसल्याने ग्राहकांना मीठाची पिशवी स्वतः उचलून घ्यायला सांगत असत.श्रद्धा आणि अंधश्रद्धा या विषयात मला अडकून पडायचे नाही पण मीठ आणि परंपरागत रीती रिवाजा समजले पाहिजेत.



लहान बाळाची दृष्ट काढताना तसेच नवी नवरी घरात पाऊल टाकताना मीठ मोहरींने दृष्ट काढली जायची. मग दृष्ट काढलेली मोहरी आणि मीठ चूलीत टाकले जायचे म्हणजे कुणाची भुताखेताची,माणसाची नजर लागली असेल तर ती जळून जावी. आहारात तर मीठ अगदी अग्रस्थानी आहे, किंचित प्रमाणात उपस्थिती असली तर जेवणाला लज्जत वाढते आणि जेवणात जर मीठ नसेल आणखी सर्व वस्तू जरी असल्या तरी त्या जेवणाला बेचव म्हणून नाव ठेवले जाईल किंबहुना बेचव अळणी जेवण कोण कसे जेवेल?? ही आहे मीठाची खरी ताकत.!!

काही पदार्थ दीर्घकाळ टिकण्यासाठी मीठात घालून ठेवले जातात. त्यामुळे त्या पदार्थाचे आयुष्य वाढते. मृत्यू नंतरही प्रेताचं दहन करताना मीठाचा वापर केला जातो. त्यामुळे 'जिंदगी के साथ भी जिंदगी के बाद भी!' पौराणिक कथांमध्ये मीठाचं वेगळंच स्थान आहे. खरंतर मीठ हे समुद्राच्या खाऱ्या पाण्यापासून बनविले जाते. मिठागर, मिठाची शेती केली जाते.पण पौराणिक काळात असे म्हटले जाते की सर्व समुद्रांचे पाणी पहिल्यांदा गोड होते पण अगस्ती ऋषींनी कोपाने रागाच्या भरात सर्व समुद्र एका आचमनात प्राशन करून टाकले होते. नंतर एवढं पाणी उत्सर्जित केले तेव्हा त्या पाण्याला खारटपणा प्राप्त झाला असा अंधश्रद्धाळू समज आहे. आमच्या लहानपणी आमच्या घरी पावसाळ्यापूर्वी मिठाची बेगमी केली जायची. आमच्या घरचे खडा मीठाच्या दोन फऱ्या (पोती) घ्यायचे. घरोघरी खडा मीठ फरी पावसाळ्यासाठी ठेवणीचे मीठ म्हणून खरेदी केलं जायचं. मीठाची एक फरी चूलीच्या पाटणाशेजारी ठेवली जायची. ती जागा ती भींत पावसाळ्यात आरपार ओलसरपणाने तवायची.दुसरी मीठाची फरी गाईगुरांना रोज पाणी देताना मीठ टाकून दिले जायचे म्हणून ती वाड्यात ठेवली जायची. उपयोगी ठरणारे मीठ म्हणजे आपल्या जीवनातील अत्यंत महत्त्वाचे आहे.**

---

# योगी पावन मनाचा

जावे संतांच्या गावा!
अनुराधा म्हात्रे




**श्रीस्वामी स्वरूपानंद (पावस)**
**भाग २**

भगवद्गीतेमध्ये भगवंताने त्याला प्रिय असणाऱ्या भक्ताची लक्षणे सांगितली आहेत. कुणाचा कधीही द्वेष न करणे, सर्वांवर स्वार्थरहित प्रेम करणे आणि सर्व भूतमात्रांबद्दल मनात अत्यंतिक करुणा असणेही त्यातली काही लक्षणे आहेत. असा योगी भगवंताला प्रिय आहे.श्रीस्वामी स्वरूपानंद या सर्व लक्षणांनी युक्त असलेले योगी पुरुष होते. अगदी लहान वयातच त्यांच्यामध्ये हे गुण दिसत होते. त्यांच्या चरित्रामध्ये असे अनेक प्रसंग आलेले आहेत

पूर्वायुष्यांत स्वामी एकदा पुण्याहून पावसला निघाले होते. त्या काळामध्ये प्रवास आजच्या सारखा सोपा नव्हता. पुण्याहून रत्नागिरीला जाण्यासाठी स्वामी कोल्हापूरला आले. त्यादिवशी पाऊस खूप झाला होता. त्यामुळे वाटेमध्ये 'रेडेडोह' नावाचा जो सखल भाग होता, तिथे कमरे एवढे पाणी साचले होते. पलीकडच्या काठावर रत्नागिरीला जाणारी सर्विस मोटार थांबली होती पण पाण्यातून पलीकडे जाण्याचे कुणाचेच धाडस होत नव्हते. अखेर स्वामींनी एका छोट्या होडीने हा डोह पार करण्याचा निर्णय घेतला. सहप्रवाशांना घेऊन ते होडीने पलीकडच्या काठावर निघाले पण वाटेत एका दलदलीच्या उंचट्यावर होडी अडकून पडली. सर्व प्रवासी घाबरले पण स्वामी डोलकाठीच्या आधाराने पाण्यांतून वाट काढून पलीकडे गेले. ही वाट सुरक्षित आहे अशी त्यांची खात्री पटल्यावर, त्यांनी सर्व प्रवाशांना धीर देत, सहीसलामत पलिकडच्या काठावर नेले. त्या प्रवाशांचे सामान ही स्वामींनी डोक्यावर वाहून नेले. सर्व प्रवाशांची सुखरूप सुटका झाली. स्वामींच्या रूपाने जणू, देवच भेटला असे त्यांना त्यावेळी वाटले असेल! हे 'देवत्व' स्वामींमध्ये होतेच हे त्यांच्या पुढील आयुष्यात सिद्ध झाले.

या प्रसंगातून स्वामींची निर्भयता दिसून येतेच पण त्याचबरोबर इतरांबद्दल वाटणारी करुणा ही दिसते. स्वामींच्या आयुष्यात अशा प्रसंगाची रेलचेल आहे पुन्हा एकदा भगवद्गीतेचा दाखला देऊन सांगायचे तर, ते 'सर्वभूतहितेरता' होते; म्हणजे सर्व प्र णीमात्रांच्या कल्याणाची चिंता वाहणारे होते.



एकदा स्वामी रत्नागिरीतींल रस्त्याने चालले असताना, छोट्या पुलाच्या कठड्यावर त्यांना एक तरुण बसलेला दिसला. त्याच्याकडे पाहून तो खूप दुःखी आणि चिंताग्रस्त वाटत होता. स्वामींनी जवळ जाऊन आपुलकीने त्याची चौकशी केली. तेंव्हा कळले की, मॅट्रिकच्या परीक्षेची फी भरण्यासाठी त्याच्याकडे पैसे नव्हते, त्यामुळे त्याचे वर्ष वाया जाणार होते. स्वामींनी तत्काळ खिशात हात घालून त्यांच्याकडची एकुलती एक दहाची नोट त्याच्या हातात ठेवली. पुढे तो मुलगा एक प्रतिष्ठित सधन गृहस्थ झाला. देवदूत म्हणून स्वामींची ओळख त्यांनी कायम आपल्या हृदयात जपली, पण आपल्याकडून असं काही काम झाले हे स्वामींच्या गावीही नव्हते! स्वामी साधकावस्थेत असतानाची गोष्ट आहे. त्यांचे मित्र पटवर्धन मास्तर अध्यात्मिक वृत्तीचे होते पण आपल्याला गुरु मिळणे शक्य नाही अशाप्रकारच्या निराशाने त्यांना घेरले होते. स्वामींनी त्यांच्या मनातील निराशा दूर करत त्यांना अनुग्रहासाठी तयार केले. त्यांना घेऊन पुण्याला सद्गुरु गणेशनाथ उर्फ बाबा महाराज यांच्याकडे जायचा बेत केला. प्रथम ते मुंबईंत गेले. मुंबईत असलेले त्यांचे मामा केशवराव गोखले हे गणेश नाथांचे प्रिय शिष्य होते त्यामुळे त्यांची शिफारस घ्यावी असा विचार स्वामींनी केला पण झाले उलटेच! मामांनी भाच्याची चांगलीच खरडपट्टी काढली. ते म्हणाले,'अरे सद्गुरु बाबामहाराजांचा स्वभाव तापट आहे. त्यांना हे आवडणार नाही. मी तुझ्याबरोबर येणार नाही. तुझा तू जा, आणि जमेल तसे कर!'' स्वामींनी जिद्द सोडली नाही. ते पटवर्धन मास्तरांना घेऊन पुण्याला आले. तिथेही गणेशनाथ महाराजांनी स्वामींवर आग पाखडली. ते म्हणाले, नसत्या उठाठेवी कशाला करता? जगाचा उद्धार करायला निघालात का? तुम्हाला मिळाले आहे ते अधी पोटभर खा'' स्वामींनी आवाक्षरही काढले नाही. त्यांना माहीत होते की, गुरूमाऊली रागावली तरी कठोर होणार नाही, आणि तसेच झाले.

बाबामहाराज थोड्यावेळाने शांत झाल्यावर म्हणाले, 'ठीक आहे. उद्या सकाळी यांना घेऊन या'' आणि स्वामींच्या मित्राचा अनुग्रह झाला. अध्यात्मातिलजो राजमार्ग आपल्याला सापडला त्याचा लाभ आपल्या मित्रांनाही व्हावा या सद्भावनेतून स्वामींनी हा खटाटोप केला.


या सर्व घटना स्वामींच्या पूर्वायुष्यातील आहेत. त्यावेळी ते 'स्वामीपदा'ला पोहोचले नव्हते. यावरून दिसून येते की, त्यांचा पिंडच साधूचा होता. लोकांबद्दल अपार करूणा आणि लोकहिताची तळमळ तारुण्यावस्थेतच त्यांच्या व्यक्तिमत्त्वांत दिसून येतं होती. श्रीस्वामींनी त्यांच्या संजीवनी गाथा या ग्रंथांमध्ये संतांची लक्षणे सांगितली आहेत. त्याचाच आधार घेऊन स्वामींचे वर्णन करणे उचित ठरेल.

**'विषयीं विरक्ति दया सर्वां भूतीं ।**
**हरीपायीं भक्ति एकनिष्ठ ।।**
**नेणे पर-निंदा न बोले अनृत ।**
**सर्व- भूत -हित लक्षी सदा।।'**

असे परम कनवाळू, परम दयाळू आणि सर्व भूतमात्रांचे सदैव कल्याण चिंतणारे श्रीस्वामी स्वरूपानंद हे अद्वितीय सत्पुरुष होते. **


---

# चेहरे संपले



निलेश साठे

या जगात येणारा प्रत्येक व्यक्ती वेगळा आहे. प्रत्येकाची शरीरचना वरवर पाहता एकसारखी दिसत असेल तरीसुद्धा आपण वेगवेगळे आहोत. प्रत्येकाच्या शरीरामध्ये आणि चेहऱ्यामध्ये काही ना काही बदल आहे. परंतु असे म्हणतात की आपल्यासारखे दिसणारे सात चेहरे या जगामध्ये आहेत. आपल्यासारखा एखादा मिळता जुळता चेहरा अचानक समोर आला तर आपल्याला सुद्धा फार बरं वाटतं फार मोठे अप्रूप वाटतं आपल्यासारखं कोणीतरी दिसणारं आहे या जगामध्ये. पण एखादा चेहरा आपल्यापेक्षाही खूपच, अधिकच सुंदर असेल तर आपल्याला सुद्धा सहज वाटतं आपणसुद्धा याच्यासारखं दिसायला हवं होतं. प्रत्येकामध्ये वेगळेपणा हा कसं काय त्या निर्मात्याने ठेवला असेल बरे असा सहज प्रश्न मनामध्ये येतो. बऱ्याच सिनेमांमध्ये आपण डबल रोल पाहिलेला आहे. हुबेहूब दिसणाऱ्या दोन व्यक्ती धमाल मनोरंजन करत असतात. आणि कथेनुसार कोणाला फसवाफसवीसुद्धा करत असतात. फुल धमाल मनोरंजन होते. मजा येते. खरोखरच्या आयुष्यामध्ये हे शक्य आहे का?



निसर्गाने त्या निर्मात्याने आपल्याला जो एवढा सुंदर चेहरा दिला आहे त्याच्यामध्येही आपण रंगरंगोटी करून आणखी सुंदर दिसण्याचा आणि आकर्षक दिसण्याचा प्रयत्न करत असतो. यामध्ये सुंदर तरुणी आणि महिला एक पाऊल पुढेच आहे मेकअप म्हणजे मुलींचा जीव की प्राण. मेकअपपूर्वीचा चेहरा आणि मेकअप केल्यानंतरचा चेहरा यामध्ये जमीन आसमानचा फरक जाणवतो. भल्याभल्यांना फसायला देखील होते. गंमतीचा भाग सोडून द्या परंतु त्या निसर्गाने निर्मात्याने दिलेल्या सुंदर चेहऱ्याला आणखी सुंदर बनवण्यासाठी आपण किती नाना उपद्याप करत असतो.

पण जेव्हा दोन चेहरे हुबेहूब मिळते जुळते असतात तेव्हा मोठीच फसगत व्हायला होते. ओळखताही येऊ नये इतके साम्य दोन चेहऱ्यामध्ये असू शकते. हे दोन जुळ्या भावंडांसोबत घडू शकते. पण बाप आणि मुलगा आजी आणि नात. असे काहीतरी समीकरण सध्या पाहायला मिळत आहे. सुपरस्टार सैफ अली खान त्यांचा मोठा मुलगा हुबेहूब सैफ अली खान यांच्यासारखा दिसतो. प्रसिद्ध नट मोहनीश बहल यांची मुलगी हुबेहूब तिच्या आजी सारखी म्हणजे सुप्रसिद्ध नटी नूतन यांच्यासारखी दिसते. जणू नूतन यांनी पुनर्जन्मच घेतला आहे इतकी हुबेहूब प्रतिमा त्यांची दिसते. डॉक्टर श्रीराम नेने म्हणजे आपल्या माधुरी दीक्षित यांचे पती त्यांचा मुलगा ही डॉक्टर श्रीराम नेने यांच्यासारखाच हुबेहूब दिसतो. इतके हुबेहूब आणि साम्य की जणू झेरॉक्स कॉपीच. अशी बरीचशी उदाहरणे देता येतील जे हुबेहूब आणि एक सारखे दिसतात. मग याचा अर्थ काय घ्यायचा. एकसारखे हुबेहूब दिसणारे चेहरे का बनू लागले आहेत. याचा अर्थ आपण असा घ्यायचा का की लोकसंख्या प्रचंड प्रमाणात वाढली आहे त्यावर नियंत्रण ठेवणे खरच गरजेचे झाले आहे कारण प्रत्यक्ष त्या निसर्गाकडे म्हणजे निर्मात्याकडे सुद्धा नवीन चेहरा उरलेला नाही. त्याच्याकडे सुद्धा आता नवीन चेहरा राहिलेला नाही. त्यामुळेच असे तेच तेच चेहरे पुन्हा पुन्हा पाठवत आहे. खरंच चेहरे संपलेत का असा प्रश्न पडू लागला आहे. तुम्हाला काय वाटतंय खरंच चेहरे संपले असतील.?**



# चिंब भिजलेले, बरसूनी गेले...

> सहासष्ट पावसाळे पाहिले मी. किती ती रूपे वर्णावी. ढगांच्या गडगडाटासह विजेच्या कडकडाटासह कोसळता पाऊस, कधी जराही आवाज न करता लागलेली संततधार... अशी की ही आता थांबणारच नाही अशी, कधी अल्लड मुलीसारखा लपंडाव खेळणारा, प्रसन्न सरींनी वातावरण भारावून टाकणारा.... असंख्य स्मृतींना अक्षय स्थान मनात मिळाले आहे. हे किती विलोभनीय आहे , नाही? पावसा रे, या चराचरावर अधिराज्य गाजवणारा अनभिषिक्त राजा आहेस तू खरंच. तुझ्या आगमनाने सृष्टी हुंकार देते. तू जीवन आहेस, जान आहेस. आम्हा मर्त्य मानवासाठी तू वरदान आहेस.

**वर्षा कुवळेकर**

आज मी वर्षा , आजवर आयुष्यात अनुभवलेल्या वर्षावाची आठवण काढते आहे. नेमेचि येतो पावसाळा, हे सत्यच. तरीही कवींचा, लेखकांचा, बालकांचा, तरुणाईचा, अगदी सर्व वयोगटातल्या मंडळींचा लाडका असतो पाऊस आणि त्याच्या आठवणी. आज गेल्या सहासष्ट वर्षातील पाऊस कसा अनुभवला तेच आठवू लागले आहे मला. वयाची पाच साडेपाच वर्ष मी पेणला होते. चौथ्या वर्षापासून मला पावसाची मजा कळायला लागली असावी. तिथले आमचे घर अगदी रस्त्यावर. फक्त मुख्य दरवाजासमोर तीन फूट रुंद आणि चार फूट लांब चौथरा होता. पेणमध्ये त्या चौथऱ्यावर उभे राहून टाळ्या पिटत मी पावसात नाचलेली आठवते.

त्यानंतर शेजारच्या मित्रमंडळींबरोबर अंगणात भिजत असताना आमचे सख्खे शेजारी आणि माझे अमाप लाड करणारे गोखले कुटुंब, त्यातील एखादा दादा झपकन येऊन, मला उचलून, एक लटकी चापटी देऊन घरात आणून सोडायचा. ''काकू राणी भिजली बघा पुन्हा'' अशी आरोळी ठोकून घरी पळे.

माझ्या बाबांच्या पाठुंगळी बसून पावसाच्या धारा घेतल्या तेही आठवते मला. घरामागे तलाव होता. त्यात टिपटिपणारा पाऊस बघायला आवडायचे फार.

माझ्या विशीपर्यंत मी अलिबागमध्ये राहिले. वाढत्या वयाबरोबर प्रगल्भ होत पाऊस बघत राहिले. आमच्या शाळेत आजूबाजूच्या खेड्यातून मुली चालत येत. साधीशी छत्री असे किंवा नसेही. कोकणातील जोरदार पावसात शाळेत येईपर्यंत चिंब भिजून जात. आमच्या मुख्याध्यापिका बाईंनी त्यांच्या अधिकारात केवळ या भिजून आलेल्या मुली दिवसभर कशा बसतील यासाठी सुट्टी दिलेली आहे. आम्ही जवळपास राहणाऱ्या मात्र सुट्टी मिळाली याचाच आनंद मनवत जवळ असलेली छत्री मिटून निघायचो. वाटेत वाहणारे पाणी तेव्हा अगदी स्वच्छ असे. त्यात थपथप करत, उड्या मारत यायला फार मजा यायची बाई. घरी आले की आईला मात्र मला कोरडे करायची घाई असे. माझे केस खूप घनदाट होते. ते वाळवण्याची जबाबदारी तिचीच ना! टॉवेलने कोरडे करून कधी क्वचित धुरी देऊन मायेने केस आवरणारी आई आत्ता आठवली, हळवे करून गेली.

आमचे बरेच जवळचे नातलग खानदेश आणि विदर्भात रहिवास असणारे. पावसाळ्याचा त्यांचा अनुभव फारच वेगळा. तिथे अल्प स्वल्प पाऊस आणि इकडे विचारायलाच नको. संततधार लागलेली. सातेरे वगैरे असले तर बघायलाच नको. सातेरे म्हणजे सात दिवस अहोरात्र पाऊस. अशी अनेक दिवसांची नावे आहेत. नॉनस्टॉप पाऊस. असा लागला की आमचे पाहुणे अगदी घाबरून जात. मला चांगले आठवते की, एकदा आजी-आजोबा आले असताना अकरा दिवस संततधार लागली. ज्या दिवशी पावसाने उसंत घेतली, मिळेल त्या गाडीने ते दोघे आधी अलिबाग बाहेर पडले. असो.

कॉलेज आमचे समुद्रकाठी. त्या प्रांगणात असताना पाऊस आला की, समुद्राच्या दिशेने सुसाट वेगाने यायचा. छत्रीचा शून्य उपयोग असे. आडोसा शोधणे याला पर्याय नव्हता. एकतर वर्गांच्या वळचणीला किंवा लुटूपुटीचा आडोसा म्हणजे सुरूच्या झाडाखाली उभे राहणे. बारीक, चिंचोळ्या धारा पडत राहात. अशावेळी तरुणाईला खास मित्र अथवा मैत्रिणींसह भिजण्याची खुमारीच अनोखी. ती ज्याने त्यानेच अनुभवावी. दुसऱ्याने सांगून त्यातील गंमत कळणे अशक्य.

ही गंमतही मी अनुभवलीच. तो पाऊसच निराळा, ते भिजणे ही निराळे. पावसाच्या सरीवर स्वार होते मन. कितीही काळ गेला तरी सेकंदेच सरली की... असे वाटायला लावणारे वय, ते कोवळे प्रेम, सहवासाचा आनंद. ते रेशमी दिवस फिरून परत कधीच न येणारे असतात. नशिबानेच लाभतात. लग्नानंतर डहाणूचे दिवस. नवपरिणीत आम्ही दोघे. समुद्र किनाऱ्यावर घर होते आमचे. पावसात रंग बदलणारा सागर वेड लावतो. धुवाधार पावसात त्याची घनगंभीर गाज खर्जात काही सांगू पाहते. आपल्याला ही अंतर्मुख करते. बुलेटवरून भर कोसळणाऱ्या वर्षेमध्ये सहचराच्या पाठीवर तोंड झाकण्याचा लटका प्रयत्न करीत अनेकदा केलेला प्रवास छान आठवतो. चित्तवृत्ती फुलून कशा येतात, त्याचा जिवंत अनुभव. पाण्याचे सपकारे चेहऱ्यावर बसत असतात. जोरात चपराक दिल्यासारखे वाटतेय, तरीही मज्जा येते. चालवणाऱ्याला मात्र सांभाळून राहावे लागते.

यानंतरची पंचवीस वर्षे मुंबईची. कोकणात पडतो तसाच पावसाळा इथेही. त्याची आम्हाला सवय होती. पण, मुंबईत ठिकठिकाणी साचणारे पाणी, बंद पडणारे रस्ते, रेल्वे यांनी निराळीच दुनिया दाखवली. सर्वात भीती वाटली जेव्हा माझा छोटासा मुलगा शाळेत होता आणि पडलेल्या पावसाने त्याच्यापर्यंत पोहोचणारे मार्ग बंद केले. माझ्या सखीने त्याला तिच्या घरी नेले तरी मी खांद्यापर्यंत येणाऱ्या पाण्यातून दादरपर्यंत चालत केलेला तो प्रवास, आजही मला धडकी भरवतो.

तसाच भयकारी अनुभव एका पावसाळ्यात ढगफुटी झाली आणि प्रचंड पाऊस कोसळला. आम्ही चौथ्या मजल्यावर सुरक्षित होतो, सुदैवाने सगळे घरात होतो, परंतु तळमजला बुडाला पाण्यात. त्या लोकांना आसरा जरी दिला, तरी झालेले अपरिमित नुकसान आम्हाला मुळातून हलवून गेले. सुरक्षित घरांमध्ये बसून पाऊस एन्जॉय करणे हे नशीबवान लोकांना मिळते. पण पाऊस म्हटले की डोळ्यात भीतीही उभे राहणारे लोक मला मुंबईने दाखवले. घरच नाही, असले तर असंख्य ठिकाणी गळणारी झोपडी, पाणी भरण्याची धास्ती घेऊन जीव मुठीत घेऊन त्यांनी काढलेल्या रात्री हे फार फार कठीण आहे. ही जाणीव मुंबईत झाली.

यावरूनच आठवण आली ती आमच्या कुटुंबाने घेतलेल्या विदारक अनुभवाची. माझी आत्या अहमदनगरला राहायची. हा कायम दुष्काळी जिल्हा. नेहमी पाण्याचे दुर्भिक्ष्य. एक वर्ष निसर्गच कोपला. अचानक रात्री भयानक पाऊस सुरू झाला. लोक आपापल्या घरात झोपले होते. पाणी भरू लागले आणि हा हा म्हणता गळ्यापर्यंत आले. आत्याच्या शेजाऱ्यांनी दरवाजा ठोकला. दार उघडताच पाण्याचा लोंढा घुसला आत. समजेच ना काय चाललंय. शेजाऱ्यांनीच मुलांना डोक्यावर घेतले, आत्या काकांना हात धरून बाहेर सुरक्षित केले. सगळा संसार वाहून गेला तिचा. आत्याचा अत्यंत व्यथित चेहरा मी कधीही विसरू शकले नाही.

स्वत:च्या कारमध्ये बसून मुंबईत पाऊस एन्जॉय ही खूप केला की. धुवाधार धारा कोसळताहेत, काचेतून मुश्किलीने बाहेरचे दिसते आहे, अशी वरळी, जुहू, मरीन लाइन्स इथून केलेली भ्रमंती खूप आनंददायी होती. त्यावेळी अनेकदा कर्नाळा इथे मुद्दाम पावसात यायचे, राहायचे, जंगलातील पाऊस पाहायचा हे ही खूप आवडीने केले आम्ही. घनदाट जंगलातील वर्षाव फार वेगळा भासतो बरं का! गच्च ओली झाडे वेगळीच दिसतात. जिवंतपणा येतो त्यात. चराचर सजग होते. त्यातील पशू पक्षी वेगळेच जाणवतात. ओला हिरवा रंग, त्याला एक सुवास आल्यासारखे वाटत राहते.

आता साठीनंतर परत एकदा अलिबागला आले आहे. पावसाची अनेक अंगे जाणतेपणी पाहते आहे. आजवर न कळलेल्या संगती लावते आहे. बाग, कीटक, पक्षी, वेली, शेती, सगळेच नव्याने दिसतेय मला. खरा आनंद घेते आहे.

एका छोट्याशा गावात राहताना, इथल्या शेतकरी मंडळींची दिनचर्या पाहते आहे. पावसाच्या आगमनाकडे डोळे लागलेली मंडळी, पहिल्याच पावसानंतर किती लगबगीने कामाला लागतात. नांगर खांद्यावर घेऊन आनंदित चेहऱ्याने जेव्हा ते घराघरांतून निघतात तेव्हा मलाही फार उल्हासित वाटतं. पेरणी, लावणी, खुरपणी, बेणणी... सगळ्या नियमित कृती अर्थात पावसावर अवलंबून.

पिकं स्थिरावली की उत्साहाने सण साजरे करतात. गोकुळाष्टमी या दिवशी पावसात भिजत गाणी गात घरोघरी कृष्णाच्या नावाने गाणी गात, दहीपोहे खायला येतात. गावातल्या या सणांची मौज न्यारी. हा आनंद माझ्या साठीनंतर बघते आहे. सहासष्ट पावसाळे पाहिले मी. किती ती रूपे वर्णावी. ढगांच्या गडगडाटासह विजेच्या कडकडाटासह कोसळता पाऊस, कधी जराही आवाज न करता लागलेली संततधार... अशी की ही आता थांबणारच नाही अशी, कधी अल्लड मुलीसारखा लपंडाव खेळणारा, प्रसन्न सरींनी वातावरण भारावून टाकणारा.... असंख्य स्मृतींना अक्षय स्थान मनात मिळाले आहे . हे किती विलोभनीय आहे , नाही?

पावसा रे, या चराचरावर अधिराज्य गाजवणारा अनभिषिक्त राजा आहेस तू खरंच. तुझ्या आगमनाने सृष्टी हुंकार देते. तू जीवन आहेस, जान आहेस. आम्हा मर्त्य मानवासाठी तू वरदान आहेस. पूर्णार्थ लक्षात घेऊन हे ऋतो तुला माझे शतश: नमन!! ✻✻

## चिंतनप्रवृत्त करणारे

# येस टू लाइफ

**पुस्तक परीक्षण**

**प्रा. शाम जोगळेकर**
मो. ९२७३३४३१७७

येस टू लाईफ इन्स्पाइट ऑफ एव्हरीथिंग, या व्हिक्टर फ्रँकल (१९०५-१९९७) यांच्या इंग्रजी पुस्तकाचा अनुवाद रमा हर्डीकर -सखदेव यांनी केला आहे. हे पुस्तक मंजुल पब्लिशिंग हाउसने प्रकाशित केले आहे. या पुस्तकाला डॅनियल गोलमन यांची प्रदीर्घ प्रस्तावना आहे. छळछावणीतून सुटका झाल्यानंतर, केवळ नऊ महिन्यांनी मानसोपचारतज्ज्ञ डॉ.फ्रँकल यांनी १९४६ साली व्हिएन्नामधील प्रौढ शिक्षण विद्यालयात तीन व्याख्याने दिली होती. मूळ जर्मन भाषेत हे पुस्तक प्रथम प्रसिद्ध झाले होते. त्यानंतर काही काळानंतर हे पुस्तक इंग्रजीत प्रकाशित झाल्यावर या पुस्तकाला प्रचंड यश लाभले होते. मानवसंहारात लाखो लोक छळछावण्यांमध्ये मरण पावले होते. त्यामध्ये व्हिक्टर यांचे आईवडील आणि त्यांची गरोदर पत्नीही होती. व्हिक्टर यांच्या विशिष्ट दृष्टिकोनामुळे त्यांच्या पुस्तकांतून आणि व्याख्यानांतून लाखो लोकांना प्रेरणा मिळाली.




फ्रँकलप्रमाणेच छळछावण्यांमधून वाचलेल्या अनेकांनी आशावादी दृष्टिकोन स्वीकारला होता. नरकयातना सोसूनही त्यांनी, आयुष्याला कवेत घेण्याचा त्यांचा निश्चय होता. आयुष्याला जणु त्यांनी ''होकार'' दिला होता. फ्रँकल यांच्याबरोबरचे छळछावणीतील काही कैदी ''येस टू लाईफ'' ही ओळ असलेले गाणे हळू आवाजात म्हणत असत. फ्रँकल यांनी जी अग्निदिव्ये सहन केली, त्यातूनच त्यांचे शब्द घडले आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे आजही ते तितकेच कालसुसंगत आहेत. फ्रँकल यांनी दयामरणाच्या मागचं गृहितक खोदून काढण्यासाठी बराच काळ खर्च केला होता.त्याच्या विकृत अर्थाला विरोध केला होता. फ्रँकल ठामपणे म्हणतात की, कोणत्याही दुसऱ्या व्यक्तीच्या आयुष्याला निरर्थक म्हणण्याचा अधिकार कोणालाही नाही किंवा दुसरी व्यक्ती जगायला लायक नाही, असे म्हणण्याचाही अधिकार नाही. मानसोपचाराच्या जगातलं फ्रँकल यांचं सर्वात मोठे योगदान म्हणजे

''लोगोथेरपी''. यामध्ये लोकांना त्यांच्या जीवनाचा अर्थ शोधण्यास मदत केली जाते आणि त्याद्वारे त्यांच्या मानसिक समस्यांवर उपाय केले जातात. केवळ आनंदाचा शोध न घेता, जीवनाने आपल्याला देऊ केलेला उद्देश आपण शोधू शकतो, असं फ्रँकल सुचवतात. केवळ आनंद हे उद्दिष्ट होऊ शकत नाही. उलट समस्या आणि आव्हाने ही जितकी जास्त कठीण तितकी जास्त अर्थपूर्ण बनू शकतात. फ्रँकल यांच्याम ते आपल्या कृतीतून, प्रेम करण्यामधून आणि यातनांमधून आपले जीवन अर्थपूर्ण बनते. जीवनोद्देश असलेले बरेच लोक अधिक वर्षे जगतात. समाधान आणि आरोग्याचे जे आधारस्तंभ आहेत, त्यात 'उद्देश' हाही एक आधारस्तंभ आहे, असे संशोधकांच्या लक्षात आले आहे. फ्रँकल यांच्यामते, आत्महत्या कधीच कोणतीही समस्या सोडवू शकत नाही.

व्हिक्टर फ्रँकल यांच्या तीन व्याख्यानांचा विशिष्ट उद्देश होता. लोक कोणत्याही परिस्थितीत, कठीणसमयी आणि मृत्यूतही, शारीरिक आणि मानसिक आजारांच्या यातना आणि भोगांतूनही आणि छळछावणीत वाट्याला आलेल्या नशिबातही जीवनाला होकार देऊ शकतात, हे कसे होऊ शकते, हे या तीन व्याख्यानांतून सविस्तरपणे मांडले गेले आहे. १९४६, नंतरच्या युद्धोत्तर काळात जीवनाच्या अर्थपूर्णतेवरचा विश्वास उडाला होता. या भावनेवर मात करण्याची गरज होती. भूतकाळातून आपण दोन गोष्टी शिकलो. सगळं काही वैयक्तिक आणि सगळं काही प्रत्येक माणसावर अवलंबून असते. आयुष्य हे कर्तव्य आहे. त्यामुळे आत्महत्येचे समर्थन होणारच नाही. जीवनाच्या या विशिष्ट पर्यावरणात कोणत्याही व्यक्तीची जागा दुसरी व्यक्ती घेऊ शकणार नाही. आपल्या कृतीतूनच आपण आपल्या आयुष्याला अर्थ देऊ शकतो. प्रेम करण्यातून आणि भोगातूनही आयुष्य अर्थपूर्ण बनते. आपले जीवन मृत्यूने निश्चित केले आहे. जीवन ही काही करण्याची संधी आहे.

जीवन अर्थपूर्ण असेल तर यातनांनासुद्धा अर्थ कसा प्राप्त होतो हे दुसऱ्या व्याख्यानात स्पष्ट केले आहे. यातना आणि आजारपण या दोन भिन्न गोष्टी आहेत. मनाच्या काही आजारांत रुग्णाला यातनाच होत नाहीत. हेच त्यांचे भोग! एखाद्याचं आजारपणातलं आयुष्य किंवा मृत्यूच्या दारातलं आयुष्य हेसुद्धा मुळीच निरर्थक नसतं.

छळछावण्यांतील विविध अनुभवांच्या आधारे फ्रँकल यांनी त्यातील अर्थपूर्णता कशी प्राप्त करता येते, हे तिसऱ्या व्याख्यानातून सोदाहरण स्पष्ट केले आहे. एखाद्याच्या नागरिकत्वावरून, त्याच्या मातृभाषेवरून किंवा जन्मस्थानावरून त्याला जबाबदार धरणे हे चुकीचे आहे, वेडेपणाचे आहे. जबाबदारी ही माणसाला आकर्षितही करते आणि दूर पळायलाही भाग पाडते. कारण विरुद्ध शक्ती कार्यरत असतात. जीवनाला होकार देणे म्हणजेच सकारात्मकतेने आयुष्याला कवेत घेणं. हे कोणत्याही परिस्थितीत अर्थपूर्ण आहेच, असेही शेवटी फ्रँकल सांगतात. ''उपसंहार'' मध्ये फ्रांझ वेसली यांनी युद्धोत्तर काळातील फ्रँकल यांच्या महान कार्याचा आढावा घेतला आहे. व्हिक्टर फ्रँकल यांच्याविषयी आणि त्यांच्या नावाच्या संस्थेची माहितीही शेवटी दिली आहे. अनुवादिकेचा परिचय शेवटी दिला आहे. या पुस्तकाद्वारे मराठी भाषकांना व्हिक्टर फ्रँकल यांचे प्रेरणादायी विचार वाचावयास मिळतात आणि ते चिंतनास प्रवृत्त करतात. हेच या छोट्याशा पुस्तकाचे मोठे यश आहे. ✻✻

**पुस्तकाचे नाव : येस टू लाइफ**
**लेखक : व्हिक्टर फ्रँकल**
**अनुवाद : रमा हर्डीकर-सखदेव प्रकाशक : मंजुल पब्लिशिंग हाउस,१०३१, टिळक रोड, पुणे २. मराठी प्रथमावृत्ती : २०२१**
**पृष्ठे :९२. किंमत : रु.१९९/-**

# कीड रोग नियंत्रणाचे पारंपरिक उपाय

**श्री. प्रमोद जाधव**
सहआयुक्त, समाजकल्याण

६ खोड किडा लावणीनंतर सात दिवसांनी तंबाखूचा चुरा / कचरा शेतात पसरावा.

७ खोड किडा पांगारा झाडाच्या फांद्या शेतात ठेवाव्यात.

८ खोड किडा (अ )आसाम मध्ये शेवग्याच्या लहान फांद्या चेचून शेतात ठेवतात. (ब) आसाम मध्ये भातवाढीच्या अवस्थेत पपनस चे साल शेतात टाकतात,

९. पिवळा खोड किडा लावणीनंतर ३ दिवसांनी गरारीची (Ceistanthus Collinus) ७५ किलो ते १५० किलो पाने झारखंड मधील शेतकरी शेतात पसरतात.

१०. खोड किडा पतंग लावणी करताना रोपाचे वरचे टोक कापावे.

११. खोडकिडा व तपकिरी तुडतुडा गुळवेल:- १. गुळवेलचे एक फुट आकाराचे तुकडे बारीक करतात. एका जाळीत गुळवेलचे तुकडे ठेवून पाण्याच्या प्रवाहात ठेवतात. दोन आठवड्यात पुन्हा तुकडे ठेवतात. मात्र कणीस येऊ लागल्यावर हा उपाय करु नये. कारण दाणे कडवट होण्याची शक्यता असते. २.१ किलो गुळवेल, दोन मोठे कांदे, अर्धा किलो हळद पावडर यांचे मिश्रण उकळून काढा करण्यात येतो. हा पाण्यात मिसळून फवारणी करतात. ३. वर्धा येथील शेतकरी विवेक रानडे हे गुळवेल व इतर वनस्पतींच्या काढ्याचा उपयोग वनस्पतींच्या वाढीसाठी आणि रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी करतात.

१२. तपकिरी तुडतुडा १० कि. नारळाच्या करवंटीची राख एक एकर शेतात फवारावी.

१३.तपकिरी तुडतुडा निम पेंड बारीक करुन पाण्यात मिसळावी. लावणीनंतर १०, २५, ४० दिवसानंतर हे मिश्रण फवारावे.

१४. तपकिरी तुडतुडा कोरफड जेल गोमुत्रात मिसळून उकळावे. थंड झाल्यावर हे मिश्रण फवारावे.

१५. हिरवा तुडतुडा ३ कि. रुई पाने, २ लिटर पाण्यात मिसळून मडक्यात ठेवावी. मडके ३ दिवस सावलीत ठेवावे. नंतर मिश्रण गाळून घ्यावे. त्यात १० पट पाणी मिसळून पिकावर फवारावे.

१६. तुडतुडे बांधावर १२ फूट अंतरावर रुई लावावी.

१७. तुडतुडे तंबाखु पानांची फवारणी करावी.

१८. तुडतुडे (Grass Hopper) बांधावर अगती (Sesbania aegyptiaca) ची झाडे लावावीत.

१९. तुडतोडे व गवती टोळ लिंबारा पाने दीड किलो वाटून घ्यावी त्यात १० लिटर पाणी यांचे मिश्रण २४ तास ठेवावे. गाळून घेऊन फवारावे.



२०. तुडतुडा व इतर किटक रामेठा/ दंत पाडी (Lasiosiphon eriocephalus) १ किलो पाने घ्यावी. पाने बारीक करून १० लिटर पाण्यात उकळावी. यात १० पट पाणी मिसळून फवारणी करावी. पहीली फवारणी लावणीपुर्वी रोपांवर करावी. दुसरी फवारणी लावणी नंतर करावी. फवारणी करताना काळजी घ्यावी. कारण काही व्यक्तींना त्याची ॲलर्जी होऊ शकते.

२१. पाने गुंडाळणारी अळी कडुलिंब तेल व करंज तेल सम प्रमाणात घेऊन फवारावे.

२२.पाने गुंडाळणारी अळी व खोड किडा ५०० मिली निम तेल ४ किलो माती व ताजे शेण एकत्र करून दोन दिवस सावलीत ठेवावे. त्यात ५० लिटर पाणी मिसळावे व २०० ग्रॅम साबण चुरा मिसळावा. याची पिकांवर फवारणी करावी.

२३. पाने गुंडाळणारी अळी व खोड किडा आंध्रप्रदेश मधील शेतकरी भेरल्या माडची २५ ते ३० पाने बारीक करून एक एकर शेतात पसरतात.

२४. पाने गुंडाळणारी अळी कडुलिंब तेल, करंज तेल सम प्रमाणात घ्यावे त्यात अर्धा भाग रिठ्याची पावडर मिसळावी. पाणी मिसळून फवारल्यास नियंत्रण येते.

२५. पाने गुंडाळणारी अळी जंगली उसाची रोपे (Saccharum spontaneum) भातशेती भोवती लावल्यास त्यावर पाने गुंडाळणारी अळी जाते व भातपीकाचे संरक्षण होते.

२६. पाने गुंडाळणारी अळी व तुडतुडे गोरखमुंडी (Sphaeranthus Indicus) ची पाने शेतात पसरावी. याच्या वासामुळे किटक निघून जातात.

२७. पाने खाणारी अळी(Leaf caterpillars) लावणी नंतर ३० दिवसांनी १० किलो निम पेंड किंवा उंडीची पेंड एक एकर शेतात कन्याकुमारी, तामिळनाडूचे शेतकरी वापरतात.

२८. पाने खाणारी अळी (Rice horn caterpillars ) एरंडची अर्धा किलो बी व १ किलो पाने यांचे वाटून १ लिटर पाण्यात मिश्रण करावे. यात ५ लिटर पाणी मिसळून फवारणी करावी.

२९.पाने खाणारी अळी (caterpillars) उंबराचे मुळ संध्याकाळी कापावे त्यामधुन पाणी येऊ लागते. त्याखाली भांडे ठेवावे. रात्रभर जमा झालेले सुमारे ५०० ग्रॅम पाणी मध्ये १ लिटर काळ्या रंगाच्या गावठी गाईचे दुध मिसळावे तसेच आसाना झाडाच्या खोडामधून आलेला १ लिटर चिक मिसळावा. याचे चांगले मिश्रण करून १ एकर जमिनीत फवारावे.

३०.लष्करी अळी लिंबारा बियांच्या अर्काची फवारणी करावी

३१. थ्रीप्स किटक कडुलिंबपेंड पाण्यात मिसळून फवारावी.

३२. थ्रीप्स किटक रूईची पाने मातीत मिसळावी.

३३.गंधी ढेकूण (Earhead bug ) सकाळी राख फवारावी.

३४.गंधी ढेकूण (Earhead bug) दाणे तयार होतानाच्या स्थितीच्या/दुधाची स्थितीच्या वेळी केळीच्या पानाचे देठ शेतात / बांधावर ठेवावे.यावर गंधी ढेकूण आकर्षिले जातात. यामुळे भाताचा बचाव होतो.

३५ गंधी ढेकूण (Earhead bug ) दुधाच्या स्थितीच्या वेळी फणसाचे तुकडे,मेलेला बेडूक किंवा खेकडा शेतात बांबू काठीवर किंवा अन्यत्र टांगून ठेवावा. यावर गंधी ढेकूण येतात. व भाताचा बचाव होतो.तसेच टायगर बिटल हे कीटक येतात व ते गंधी ढेकूणला खातात.

३६ गंधी ढेकूण (Earhead bug) १० कि. शेणाची राख + २ कि. चुना (Lime Powder) + १ कि. तंबाखू कचरा मिसळावा. हे मिश्रण सकाळी रोपांवर फवारावे.

३७ गंधी ढेकूण (Earhead bug) १०० मिली देवबाभूळ (Acacia nilotica) रस व १० कि शेण व १० लिटर पाणी यांचे मिश्रण करुन फवारावे.

३८ गंधी ढेकूण (Earhead bug) २५० ग्रॅम लसूण ठेचावा त्यात अर्धा लिटर कडुलिंब तेल व पाणी मिसळावे याची फवारणी करावी.

३९ काटेरी भुंगा (Hispa) पपनस चे टरफलचा लगदा किंवा कदंब झाडाचे खोड शेतातील संथ वाहत्या पाण्यात ठेवावे.

४० काटेरी भुंगा (Hispa) ( अ ) आसामचे शेतकरी पेव / पुष्करमुळ (Costus Speciosus) चे कंद वाटून पेस्ट करतात व ती पाण्यात मिसळून फवारतात. (ब) आसाम मध्ये काटेरी भुंगा व खोड किडा नियंत्रणासाठी तवकिरा रानहळद ( Curcuma angustifolia ) चे कंद चेचून शेतात टाकतात. (क) काटेरी बोराच्या फांद्या वापरल्याने काटेरी भुंगा ला जखम होऊन हालचाल करताना अडचण होते.

४१ मावा (Aphid) रूईची पाने शेतात दर १० दिवसांनी पसरावी.

४२ मावा (Aphid) फुले येण्याच्या सुमारास लागण झाल्यास त्रिपूरातील शेतकरी सुके मासे दोन दिवस पाण्यात ठेवतात व हे सुक्या माशांचे पाणी पिकावर फवारतात.

४३ गाद माशी - Gallfly (Pachydiplosis oryzae) गरारीची (Ceistanthus Collinus) ४० किलो पाने १ एकर शेतात झारखंड मधील शेतकरी पसरतात.

४४ गाद माशी लिंबारा पाने दीड किलो वाटून घ्यावी त्यात १० लिटर पाणी यांचे मिश्रण २४ तास ठेवावे. गाळून घेऊन फवारावे

४५. विविध किटक (अ)सिताफळाची पाने किंवा सिताफळ बियांची पावडर शेतात पसरावी. (ब) रानमोडी (Eupatorium audoratum ) शक्यतो फुले येण्यापूर्वी शेतात तोडून पसरून टाकावी. (क)निर्गुडी च्या लहान फांद्या संथ पाण्यात टाकाव्या.

४६. विविध किटक नियंत्रण तामिळनाडू मध्ये कडू काजरा/कुचलाच्या फांद्या १० फुटाच्या अंतरावर शेतात ठेवतात.

४७. विविध किटक नियंत्रण कडूलिंबाची पाने व कांडवेल (Cissus quadragularis) च्या पानांचे मिश्रण करावे व ते गोमुत्रामध्ये मिसळून १ आठवडा ठेवावे. ते गाळून ९ पट पाण्यात मिसळून दर पंधरा दिवसांनी दोनदा फवारावे.

४८. विविध किटक नियंत्रण १ किलो शेण घेऊन १० लिटर पाण्यात मिसळून शेणाची स्लरी करावी यात १ किलो. जांभाच्या पानांचा लगदा (Xylia xylocarpus) मिसळावा. हे मिश्रण १ आठवड्याच्या अंतराने भातावर फवारावे.

४९. विविध किटक नियंत्रण १ किलो लसूण, २०० ग्रॅम तंबाखु पाने व २०० ग्रॅम साबण चुरा यांचे मिश्रण २०० लिटर पाण्यात मिसळून भातावर फवारावे.

५०. विविध किटक नियंत्रण गरारी (Ceistanthus Collinus) व धुपाळी/ साळी (Boswellia Serrata) ची पाच किलो ताजी पाने एक गुठ्यांत झारखंडचे शेतकरी पसरतात.

५१. जमिनीतून येणारे किडे White Grubs, वाळवी एरंड पेंड मातीत मिसळावी.

५२. वाळवी आंध्रप्रदेश मधील शेतकरी कडु काजरा/कुचला ची पाने शेतात पसरतात.

५३. किड व उंदीर नियंत्रण सिताफळ व निर्गुडी यांची पाच किलो सुकी पाने घेऊन एक एकर शेतात जाळल्यास नियंत्रण येण्यास मदत होते.

५४. उंदीर नियंत्रण ७५ टक्के पिकलेल्या पपयाचे तुकडे बिळांजवळ ठेवावे.

५५. करपा बुरशी गोमुत्र पाण्यात मिसळून फवारणी करावी.

५६. करपा बुरशी हिंग, हळद व कळलावी कंद सम प्रमाणात घ्यावेत. त्यांचे मिश्रण पाण्यात उकळावे. (Decoction) थंड झाल्यावर फवारावे.

५७. करपा ट्रायकोडर्मा व्हीरीडी १ ग्रॅम १ लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

५८. पानांवरील तपकिरी ठिपके ५कि. मीठ व १५ कि. बारीक रेतीत मिसळून एक एकर जमिनीत वापरावे. मात्र खार जमिनीत शक्यतो मीठ मिसळू नये.

५९. पानांवरील तपकिरी ठिपके भाताची रोपे २० टक्के पुदीना पानाच्या रसात बुडवून लावावी.

६०. पानांवरील तपकिरी ठिपके ताकाची फवारणी करावी.

६१. पानावरील तपकिरी ठिपके धोतरा पानांचा अर्क पाण्यात मिसळून फवारावा.

६२. पानावरील तपकिरी ठिपके राख पाण्यात मिसळून फवारणी करावी

६३. पानावरील ठिपके पपई पाने १ किलो बारीक करून एक लिटर पाण्यात मिसळावी. एक रात्र ठेवावे. हे मिश्रण गाळून सुमारे २५ ते ३० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.

६४. बुरशीजन्य रोग (Sheath Rot) ३ टक्के निम तेल किंवा ५ टक्के निम पेंड पाण्यात मिसळून फवारावी.

६५.बुरशीजन्य रोग (Sheath Rot) झेंडूच्या फुलाचा किंवा पानाचा रस फवारावा.

६६. बुरशीजन्य रोग (Sheath Rot) सदाफुली व कुपी (Acalypha indica) यांच्या पानांचा रस फवारावा.

६७. ब्राऊन रॉट एरंडच्या पानांचा धुर करावा.

६८.करपा (Blast) १ किलो अडुळसा पाने १० लिटर पाण्यात ३० मिनिट उकळावी. हे मिश्रण गाळून ६० ते ७० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. किंवा अडुळसाच्या पानांचा रस पाण्यात मिसळून फवारावा.

६९. करपा (Blast) उतरण झाडाच्या (Pergularia Daemia) पानांचा रस पाण्यात मिसळून फवारावा.

७०. करपा (Blast)दोन ते तीन किलो कुंभाचे खोड बारीक करून पाण्यात मिसळावे. यातील ५०० मिली मिश्रण १५ लिटर पाण्यात मिसळावे. हे मिश्रण गाळून दर १२ दिवसांनी ३ वेळा फवारावे.

टिप-कृपया झाडाच्या इंग्रजी नावावरून माहिती घ्यावी व झाड ओळखावे.

**समाप्त** ✻✻

**निवडक**

## विराटपेक्षा चांगला रेकॉर्ड

**लाहोर :** पाकिस्तानचा माजी खेळाडू कामरान अकमलचा एक व्हिडिओ व्हायरल होत आहे, ज्यात तो त्याचा धाकटा भाऊ उमर अकमलची तुलना विराट कोहलीशी करत आहे. काही दिवसांपूर्वीच उमरने त्याच्या शर्टलेस फोटो शेअर करत म्हटले होते की, हे त्या सर्वांसाठी आहे, ज्यांना असे वाटते की तो फिट नाही. या व्हिडिओमध्ये कामराने असा दावा केला आहे की उमर विराटपेक्षा चांगला खेळाडू आहे, त्याचबरोबर त्याने असेही म्हटले की आकडेवारी दाखवायला फक्त त्यांच्याकडे पीआर एजन्सी नाही.

## बोल्टची अखेरची स्पर्धा

**नवी दिल्ली :** टी-२० विश्वचषक ही स्पर्धा कारकिर्दीतील अखेरची स्पर्धा असेल, असे न्यूझीलंडचा दिग्गज वेगवान गोलंदाज ट्रेंट बोल्टने स्पष्ट केले आहे. ट्रेंट बोल्टने २०१३ साली न्यूझीलंडसाठी टी-२० क्रिकेटमध्ये पदार्पण केले होते. त्याने गेल्या ११ वर्षात २०१४, २०२१, २०२२ आणि आता २०२४ असे चार टी-२० विश्वचषक स्पर्धा खेळल्या आहेत. त्याने टी-२० विश्वचषकमध्ये १७ सामन्यांमध्ये ३२ बळी घेतले आहेत.

## जोस बटलरला पुत्ररत्न

**न्यूयॉर्क :** इंग्लंड क्रिकेट संघाचा कर्णधार जोस बटलरच्या घरी चिमुकल्याच आगमन झाले आहे. बटलरची पत्नी लूसी वेबरने गोंडस बाळाला जन्म दिला आहे. जोस बटलरने लेकाचा फोटो शेअर केला आहे. बटलरने बातमी देताच क्रिकेटमधील दिग्गजांकडून त्याला शुभेच्छा देण्यात येत आहेत. जोस बटलर आणि लूसी वेबरचे हे तिसरे अपत्य आहे. या दोघांना अगोदर दोन मुली आहेत. जोस बटलर आणि त्याच्या पत्नीने लेकाचे नाव चार्ली ठेवले आहे. चार्लीचा जन्म २८ मे रोजी झाला आहे.

## सर्व कमाई दान करणार

**नवी दिल्ली :** विश्वचषकादरम्यान, रिषभ पंतने आपली सर्व कमाई दान करण्याबद्दल बोलले आहे. पंतने १८ मे रोजी त्याचे यूट्यूब चॅनल उघडले होते. ज्यावर त्याने आतापर्यंत सात व्हिडिओ अपलोड केले असून एक लाख सबस्क्राइबर्स पूर्ण केले आहेत, त्यामुळे यूट्यूबने त्याला सिल्व्हर प्ले बटण पाठवले आहे. पंतने यूट्यूब सिल्व्हर प्ले बटणासह एक पोस्ट शेअर केली आहे, ज्यामध्ये त्याने म्हटले आहे की, तो यूट्यूब मधील सर्व कमाई, त्याच्या स्वत: च्या कमाईतील काही योगदानासह, एका चांगल्या कारणासाठी दान करेल.

## आयसीसीचे मोठं नुकसान

**न्युयॉर्क :** पाकिस्तानचा संघ हा जागतिक क्रिकेट वर्तुळातील एक महत्वाचा संघ आहे. परंतु, यंदाच्या टी-२० विश्वचषकात त्यांना फारशी चांगली कामगिरी करता आली नाही. अमेरिकेडून त्यांना पराभवाचा धक्का बसला आणि आता त्यांचे विश्वचषकातील आव्हान गृप स्टेजमध्येच संपुष्टात आले आहे. याचबरोबर पाकिस्तानची एक्झिट ही आयसीसी आणि सामन्याचे प्रसारण करणाऱ्या वाहिन्यांना देखील झटका देणारी ठरणार आहे. तो जर स्पर्धेत जास्त काळ टिकला तर आयसीसी आणि ब्रॉडकास्टर्सना चांगला फायदा होतो.

# अमेरिकेने रचला इतिहास

## पाकिस्तानला दाखवला बाहेर रस्ता | माजी खेळाडूंचे बाबर आझमवर टीकास्त्र

**। फ्लोरिडा । वृत्तसंस्था ।**

**यंदाच्या टी-२० विश्वचषकात मोठंमोठे फेर बदल होताना पहायला मिळाले आहेत. ज्यामध्ये पाकिस्तान संघाला मोठा धक्का बसाला आहे, कारण चालू विश्वचषकातून पाकिस्तान बाहेर पडला आहे. पाकिस्तानचा पहिल्या दोन सामन्यात भारत आणि अमेरिकेविरुद्ध पराभव झाला आहे. यजमान अमेरिकेने सुपर ओव्हरमध्ये पाकिस्तानला मात दिला होती. तर, भारतीय संघाने पाकिस्तानचा ६ धावांनी लाजिरवाणा पराभव केला होता. त्यानंतर पाकिस्तानने पुनरागमन करत तिसऱ्या सामन्यात कॅनडा विरुद्ध विजय मिळवला होता.**



यजमान अमेरिका संघाने विश्वचषकात उल्लेखनीय कामगिरी केली, ज्याचा फटका पाकिस्तानला बसला. अमेरिकेने आपल्या पहिल्या दोन सामन्यात विजय मिळवला होता आणि भारतासमोर त्यांचा पराभव झाला. मात्र, संघाकडे ४ गुण प्राप्त होते आणि साखळी फेरीतील शेवटचा सामना आयर्लंड विरुद्ध होणार होता. पण हा सामना पावसामुळे रद्द झाला. त्याचाच फायदा अमेरिकेला मिळाला. सामना रद्द झाल्याने संघाला १ गुण देण्यात आले. या जोरावर संघाकडे एकूण ५ गूण झाल्याने सुपर-८ साठी अमेरिका पात्र ठरला. दुसरीकडे पाकिस्तान संघ तीन पैकी एकच सामना जिंकला आहे. त्यामुळे त्यांच्याकडे केवळ २ गूण आहेत. पुढच्या सामन्यात पाकिस्तान जिंकले तरी त्यांच्याकडे ४ गूण होतील जे सुपर-८ साठी पात्र ठरण्यास पुरेसे नाहीत.

पाकिस्तानच्या संघाने विश्वचषकात खराब कामगिरी करण्याची ही काही पहिलीच वेळ नाही. याआधीही या संघाने विश्वचषकात चाहत्यांना निराश केले आहे. संघाचा कर्णधार बाबर आझमबद्दल बोलायचे झाले तर, त्याने अनेकदा मोक्याच्या क्षणी कच खाल्ली आहे. टी-२० विश्वचषकापूर्वी पाकिस्तान क्रिकेटममध्ये प्रचंड नाट्य घडले होते. याचे परिणाम संघाला भोगावे लागले.



पाकिस्तानचा संघ २०२३ मध्ये भारतात झालेल्या एकदिवसीय विश्वचषकातून गृप स्टेजमधूनच बाहेर पडला होता. यानंतर बाबर आझमला कर्णधारपदावरून हटवण्यात आले आणि शाहीन आफ्रिदीकडे संघाचे नेतृत्व देण्यात आले. या दरम्यान निवडकर्ते आणि पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे अध्यक्षही बदलण्यात आले. मात्र, या टी-२० विश्वचषकापूर्वी शाहीनला कर्णधारपदावरून हटवून पुन्हा बाबरकडे जबाबदारी सोपवण्यात आली. मात्र, त्याच्या नेतृत्वात संघ सुपर-८ मध्येही पोहोचू शकलेला नाही.

### बाबर आझमच्या नेतृत्वावर टीका

बाबर आझमचे नेतृत्व आणि संघाच्या कामगिरीवर पाकिस्तानचे माजी क्रिकेटपटूंनी खडे बोल सूनावले आहेत. त्यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर पोस्ट शेअर करत संघातील बाबर आझम तसेच खेळाडूंवर प्रतिक्रिया दिली आहेत. यावेळी वसीम आक्रम म्हणाले, अमेरिका संघ सुपर-आठसाठी पात्र ठरण्यात यशस्वी ठरला आहे. त्यांनी उत्कृष्ट खेळ दाखवला आहे ज्यामुळे हा संघ सुपर-८ मध्ये जाण्यास पात्र आहे. आता पाकिस्तानची काय योजना आहे, आता त्यांना यूकेची फ्लाईट पकडावी लागेल. 'आधी यूके आणि नंतर घरी जा' अश्या शब्दात वसीम आक्रमने राग व्यक्त केला आहे. याच दरम्यान, शोएब अख्तरने लिहिले, 'पाकिस्तानचा विश्वचषक प्रवास संपला'.

### 'कुर्बानी के जानवर हाजिर हों'

संघाचा माजी कर्णधार मोहम्मद हाफिजनेही या खेळाडूंचा समाचार घेतला आहे. त्याने पाकिस्तान क्रिकेट हॅशटॅगसह आपल्या पोस्टमध्ये लिहिले, 'कुर्बानी के जानवर हाजिर हो', असे म्हणत खडसावले आहे. पोस्ट शेअर करताना शहजादने लिहिले की, योग्य संघ सुपर-८ फेरीत पोहोचला आहे. जर तुम्ही कोणालाही हरवण्यासाठी आयर्लंडवर अवलंबून असाल, तर तुम्ही पात्र ठरण्यास पात्र नाही. असा विचार करू नका की, 'कुदरत का निजाम' देखील यासाठी काम करतो. जे पात्र नाहीत किंवा **सुधारण्यास** इच्छुक नाहीत त्यांच्याकडे तसेच पीसीबीच्या अध्यक्षांवर आता सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

# आफ्रिकेचा मानहानिकारक पराभव टळला

## नेपाळचा अवघ्या एका धावेने पराभव

**। किंग्सटाउन । वृत्तसंस्था ।**



टी-२० विश्वचषक गृपमधील सामन्यात दक्षिण आफ्रिकेने नेपाळचा शेवटच्या चेंडूवर पराभव करत आपला मानहानिकारक पराभव टाळला. शेवटच्या चेंडूवर नेपाळला विजयासाठी २ धावांची गरज असताना क्लासेनने गुलशनला धावबाद केले. आफ्रिकेच्या या विजयात फिरकीपटू तबरेजचा सिंहाचा वाटा होता. त्याने ४ षटकात १९ धावा देत ४ बळी घेतले. नेपाळकडून आसिफ शेखने झुंजार खेळी करत ४२ धावा केल्या. अनिल साहने २७ धावा केल्या.

'ड' गृपच्या नेपाळ विरूद्ध दक्षिण आफ्रिका सामन्यात नेपाळने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. नेपाळने दमदार गोलंदाजी करत तगडी फलंदाजी असलेल्या दक्षिण आफ्रिकेला २० षटकात ११५ धावात रोखले. आफ्रिकेने हेंड्रिक्सच्या ४३ धावांच्या जोरावर पहिल्या १० षटकात चांगली सुरूवात केली होती. मात्र, त्यानंतर नेपाळने टिच्चून मारा करत आफ्रिकेच्या फलंदाजांच्या मुसक्या आवळल्या. दिपेंद्र सिंहने ३ तर कुशलने ४ षटकात ४ बळी घेतले. आफ्रिकेच्या ट्रिस्टन स्टब्सने १८ चेंडूत नाबाद २७ धावा केल्याने आफ्रिकेला २० षटकात ७ बाद ११५ धावांपर्यंत मजल मारता आली.

आफ्रिकेचे ११५ धावांचे आव्हान पार करण्यासाठी मैदानात उतरेलेल्या नेपाळने पॉवर प्लेमध्ये चांगली सुरूवात केली. मात्र, आठव्या षटकात शम्सीने कुशाल आणि पौडेलला बाद करत नेपाळला दोन धक्के दिले. त्यानंतर सलामीवीर आसिफ आणि अनिल तिसऱ्या विकेटसाठी ५० धावांची अर्धशतकी भागीदारी रचली. मात्र, मार्करमने अनिलला २७ धावांवर बाद करत ही जोडी फोडली. सामना नेपाळच्या हातात होता असे वाटत होते. नेपाळ आफ्रिकेला मात देत यंदाच्या टी-२० विश्वचषकातील अजून एक मोठा उलटफेर करणार असे वाटत असताना शम्सीने एकाच षटकात दिपेंद्रसिंह आणि आसिफला बाद केले. पाठोपाठ नॉर्खियाने कुशलला १ धावेवर बाद केले. शेवटच्या षटकात गुलशन झाने चौथ्या चेंडूवर दोन धावा घेत सामना २ चेंडूत २ धावा असा आणला. मात्र, पाचव्या चेंडूवर गुलशनला एकही धाव करता आली नाही. शेवटच्या चेंडूवर नेपाळला विजयासाठी २ धावांची गरज असताना गुलशन झा चोरटी धाव घेण्याच्या नादात धावबाद झाला.

# गिलने केले रोहितला अनफॉलो

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारताचा सलामीवीर शुभमन गिल गेल्या काही दिवसांपासून चर्चेत आला आहे. टी-२० विश्वचषकासाठी तो स्टँड बाय खेळाडू म्हणून भारतीय संघासोबत अमेरिकेला गेला होता. मात्र, आता त्याला आणि आवेश खानला मायदेशी पाठवण्यात आले आहे. भारतीय संघ अमेरिकेत खेळत होता त्यावेळी स्टँड बाय मधील खेळाडू रिंकू सिंह, आवेश खान आणि खलील अहमद हे स्टँडमध्ये येऊन संघाचा उत्साह वाढवत होते. मात्र, यामध्ये गिल कुठे दिसला नव्हता.



दरम्यान, भारताने गृप स्टेजमधील आपले तीन सामने खेळल्यानंतर आता गिल आणि आवेश यांना मायदेशात परतण्यास सांगितले आहे. तसेच, गिलने रोहित शर्माला इन्स्टाग्रावर अनफॉलो केले आहे. यावरून असे दिसत आहे की भारतीय संघ आणि शुभमन गिल यांच्यात सर्व काही ठिक नाही. आता रोहित शर्मा आणि शुभमन गिलम धील दुराव्याच्या बातम्या खऱ्या की खोट्या हे येणारा काळच सांगेल.

# अजय जडेजाच्या दिलदारपणाची गोष्ट

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतात झालेल्या २०२३च्या एकदिवसीय विश्वचषकात माजी दिग्गज खेळाडू अजय जडेजा यांनी अफगाणिस्तानच्या संघाचे मेंटॉर म्हणून काम केले होते. अफगाणिस्तानने त्या विश्वचषकात इंग्लंड, पाकिस्तान सारख्या बड्या संघांना पराभूत केले होते. तेव्हा जडेजा यांना अफगाणिस्ताच्या संघाला मार्गदर्शन करण्यासाठी मोठी रक्कम मिळाल्याच्या चर्चा झाल्या होत्या. मात्र, नव्या माहितीनुसार जडेजा यांनी अफगाणिस्तानच्या क्रिकेट बोर्डाकडून एक रुपया देखील फी म्हणून घेतलेला नाही.



अफगाणिस्तान क्रिकेट बोर्डाचे सीईओंनी चर्चा करताना याबद्दल भाष्य केले आहे. अजय जडेजा यांनी २०२३च्या एकदिवसीय विश्वचषकामध्ये अफगाणिस्ताला जे मार्गदर्शन केले, त्यासाठी बोर्डाकडून देऊ केलेली रक्कम घेण्यास नकार दिला. त्यांनी म्हटले होते की, तुम्ही चांगले क्रिकेट खेळा तेच माझ्यासाठी बक्षीस आणि पैशासारखे असेल, असे अजय जडेजा म्हणाल्याचे अफगाणिस्तान क्रिकेट बोर्डाच्या सीईओंनी सांगितले.

## न्यूझीलंडने नोंदवला पहिला विजय

**। त्रीनिनाद । वृत्तसंस्था ।**

टी-२० विश्वचषकात ३२ व्या सामन्यात न्यूझीलंड संघाने युगांडा विरुद्ध ९ गडी ८८ चेंडू राखून दमदार विजय मिळवला आहे. प्रथम फलंदाजी करताना युगांडा केवळ ४० धावांवर सर्वबाद झाला, प्रत्युत्तरात न्यूझीलंडने ५.२ षटकात सामना जिंकला. कॉनवेने २२ धावांची नाबाद खेळी खेळली. तर, गोलंदाजीत टीम साउथीने भेदक चेंडूचा मारा करत ३ बळी घेतले. त्यासोबतच बोल्ट आणि सँटनरने प्रत्येकी २-२ बळी मिळवले. या टी-२० विश्वचषकात न्यूझीलंड ३ सामने खेळला असून संघाने केवळ १ सामना जिंकला आहे.

# यजमान जर्मनीचा मोठा विजय

**। जर्मनी । वृत्तसंस्था ।**

यजमान जर्मनीने युरो कप २०२४ ची दणक्यात सुरूवात केली. जर्मनीने आपल्या पहिल्याच सामन्यात स्कॉटलँडचा ५-१ असा पराभव केला. जर्मनीकडून फ्लोरियन, जमाल, काई हावेर्ज्झ, निकोलस, एमरे कान यांनी प्रत्येकी एक गोल केला.

या सामन्यात जर्मनीने १०व्या मिनिटापासूनच गोल करण्यास सुरूवात केली होती. फ्रोलियानने १० व्या मिनिटाला मैदानी गोल नोंदवत जर्मनीचे खाते उघडले होते. त्यानंतर जमालने सामन्याच्या १९व्या मिनिटाला पुन्हा एकदा स्कॉटलँडची गोलपोस्ट भेदली. जर्मनीच्या मिडफिल्डरने स्कॉटलँडच्या बचाव फळीला आपल्या ड्रिबलिंगने चकवा दिला. त्याने दाखवलेल्या चपळाईसमोर स्कॉटलँडची बचावफळी निष्प्रभ दिसली. मुसिआलाने याचाच फायदा उचलत १९ व्या मिनिटाला जर्मनीचा दुसरा आणि आपला पहिला गोल केला.



मुसिआलाच्या गोलनंतर हावेर्झ्झने ४५व्या मिनिटाला पेनाल्टीवर जर्मनीचा तिसरा गोल केला. त्यानंतर दुसऱ्या हाफमध्ये स्कॉटलँडने जर्मनीचा गोलंचा धडाका थोपवण्याचा प्रयत्न केला. मात्र ६८व्या मिनिटाला निकोलसने जर्मनीचा चौथा गोल करत आघाडी वाढवली. दरम्यान, सामना संपवण्यासाठी अवघे काही मिनिटे शिल्लक असताना जर्मनीला स्कॉटलंडवर दया आली असावी, कारण जर्मनीच्या अँटिओनोने सेल्फ गोल करत स्कॉटलंडला खाते उघडून दिले. अखेर एक्स्ट्रा टाईममध्ये जर्मनीच्या एमरे कानने संघाचा पाचवा गोल करत जर्मनीला ५-१ असा मोठा विजय मिळवून दिला.

## अखिल भारतीय विंडसर्फिंग स्पर्धा

# महाराष्ट्राच्या नाव्या, राजचा 'सुवर्ण' पराक्रम

**। उरण । वार्ताहर ।**

महाराष्ट्राच्या तरुण विंडसर्फिंग टॅलेंट नाव्या काकू आणि राज संतोष पाटील यांनी चेन्नई येथे तामिळनाडू सेलिंग असोसिएशनने आयोजित केलेल्या आणि भारतीय तटरक्षक दलाच्या सह-यजस्वी अखिल भारतीय विंडसर्फिंग स्पर्धेत आपले पराक्रम दाखवले. दहा वर्षांच्या नाव्या काकूने १३ रेस बोर्ड प्रकारात सुवर्णपदक पटकावले. तर, राज संतोष पाटीलने १९ टेक्नो प्रकारात सुवर्णपदक मिळवून सर्वांना प्रभावित केले.




या दोघांनी संदीप म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि अयाज शेख यांच्या प्रशिक्षित यॉटिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे प्रतिनिधीत्व करताना उल्लेखनीय कामगिरीने लक्ष वेधून घेतले. युवा खेळाडूंच्या क्षमतेवर भर देत प्रशिक्षक शेख यांनी आनंद व्यक्त केला. त्यांचे कौशल्य आणखी वाढवण्यासाठी आणि राष्ट्राचे अधिक प्रभावीपणे प्रतिनिधित्व करण्यासाठी राज्य सरकारकडून त्यांना मान्यता तसचे पाठिंबा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.



हा विजय नाव्या आणि राज या दोघांचा संघ म्हणून सलग तिसरा विजय आहे. त्यांचे अलीकडील यश मागील चॅम्पियनशिप मधील त्यांच्या प्रशंसनीय कामगिरीचे अनुसरण करते, ज्यामध्ये नाव्याने नोपेन प्रकारात जिंकलेल्या रौप्य पदकांचा समावेश आहे. जिथे तिने मे मध्ये गोव्यात ओपन नेव्ही विंडसर्फिंग स्पर्धेत कांस्यपदक जिंकणाऱ्या राज यांच्याशी स्पर्धा केली होती. तर, एप्रिल महिन्यात झालेल्या ऑल इंडिया विंडसर्फिंग आणि काइटबोर्डिंग चॅम्पियनशिपमध्ये मोरजिम, गोवा येथे रेस बोर्ड प्रकारात राजने रौप्य पदक मिळवले होते.

# नेत्रावळकरचे वर्क फ्रॉम हॉटेल

**। न्युयॉर्क । वृत्तसंस्था ।**

आधी नोकरी, मग खेळ असे समीकरण असलेल्या अमेरिका क्रिकेट संघातील खेळाडूंना या दोहोंमधील समन्वय साधावा लागत आहे. सध्या चर्चेत असलेला मराठमोळा सौरभ नेत्रावळकर याला तर सकाळी सामने आणि आणि नंतर ऑफिसचे काम म्हणजेच 'वर्क फ्रॉम हॉटेल' अशी कसरत करावी लागत आहे.

अमेरिकेतील ऑरॅकल या प्रसिद्ध कंपनीत नोकरी करत आहे. टी-२० विश्वकरंडक स्पर्धा ही त्याच्यासाठी हौशेचा भाग आहे. अगोदर पाकिस्तानचा सुपर ओव्हरमध्ये पराभव केल्यानंतर भारताविरुद्धच्या सामन्यात विराट कोहली आणि रोहित शर्मा यांना बाद करून सौरभ लोकप्रियतेच्या शिखरावर पोहोचला. आपल्या अमेरिका संघाची मजल साखळी सामन्यांपर्यंतच असेल असे त्याच्यासह सर्वांनाच वाटत होते म्हणून सौरभने आपल्या कंपनीतून १५ जूनपर्यंतचीच सुट्टी घेतली, मात्र त्याचा संघ सुपर-आठ फेरीसाठी पात्र ठरत असल्यामुळे त्याला सुट्टी वाढवावी लागणार आहे. सुट्टीवर असला तरी त्याची कामापासून सुटका झालेली नाही. कंपनीचा लॅपटॉप तो सोबत बाळगत आहे. सामना संपल्यानंतर हॉटेलमध्ये परतल्यावर सौरभ ऑफिसचे काम करतो, अशी माहिती त्याच्या बहिणीने दिली आहे.



कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)